# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २०/०९/२०११**

आज मंगळवार दि. २०/०९/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०८/०८/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २४) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २५) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २६) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २७) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| २८) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| २९) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३०) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३३) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३४) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ३६) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३७) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ३८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३९) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४०) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४३) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४४) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४५) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४६) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ४७) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४८) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ४९) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५०) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५१) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५२) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५३) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५४) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५५) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५७) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५८) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ५९) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६०) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६१) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६३) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| २) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| ३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| ४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ८) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ९) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| १०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ११) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| १२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| १३) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| १४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| १५) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| १६) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| १७) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |

**नगरसचिवः-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शनिवार दि. २०/०८/२०११ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ४९ ते ५१ व पुरक घोषणा क्र. ५२ ते ५४ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार, दिनांक २०/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज

सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रकरण क्र. ४९, मिरा भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, चौपटी येथे इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**शरद पाटील:-**

मा. महापौर साहेब मला परवानगी हवी आहे. मला थोडक्यात बोलायचे आहे. आपण जे बॉम्ब स्फोटामध्ये मृत्यू पावले व जखमी झाले त्यांना मदत द्यायची ठरवले. ती मदत अजून गेलेली नाही.

**नगरसचिव :-**

आजच आहे.

**शरद पाटील :-**

आज करा तुम्हाला धन्यवाद. ती मदत फार वेळेपूर्वी जायला पाहिजे होती. आणि त्या वेळेत मिळाली असती तर लोकांना बरे वाटले असते. आपण त्याची तसदी घ्या आणि लवकर करून घ्या अशी आपल्याला विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, चौपाटीवर जी इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविण्याचा प्रस्ताव आलेला आहे. मिरा-भाईदर मध्ये अनेक आरक्षणे आहेत. चौपाटी हे एक महत्वाच आरक्षण ह्या शहराच आहे. अनेक कार्यक्रम ह्या ठिकाणी होतात. चौपाटीत बाकी ठिकाणी सी. आर झेड लागल्याने जागा खूप कमी प्रमाणात उरलेली आहेत. भविष्यात ती जागा आपल्याला उपयोगी पडणार आहे. त्या ठिकाणी आपण खेळणी बसवली आणि प्रायव्हेटिझम केल्यानंतर त्याच्यावर आपले कुठल्याही प्रकारच नियंत्रण राहणार नाही. कंट्रोल राहणार नाही. उदा. शिवार गार्डन दिल आहे. दोन रुपयावर दिले परंतू त्यानंतर त्यांनी खेळण्यासाठी तीस रुपये, चाळीस रुपये सगळयांना वेगळे वेगळे पैसे आकारले आहेत. आणि एखादा कमर्शिअल व्यक्ति आल्यानंतर आपलं त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण राहणार नाही. आपण जर ही खेळणी चौपाटीवर बसवली जर महापालिकेला वाटल असेल की एखादा इलेक्ट्रोनिक पार्क केला पाहिजे तर आपल्याकडे बरीचशी आरक्षणे आहेत ते मिरा भाईंदरला म्हणजे संपूर्ण शहराला उपयोगी पडेल. एखादा चौपाटीवर खेळणी बसवली तर मिरारोडचा जो रहिवासी आहे त्याला उपयोगी पडणार नाही. जागा खूूप कमी प्रमाणात आहे. बाकी सी. आर. झेड लागलेले आहे. मॅग्रोज लागलेले आहेत. भविष्यात ते वाढवता येणार नाही, विकसित करता येणार नाही. त्या जागेवर खेळणी बसवली तर भविष्यात नुकसान होणार ती पून्हा काढायला लागतील शहराचा विकास करायचा आपण ठरवतो. एखादा इलक्ट्रोनिक्स खेळणी बसवायची तर ती मिरा भाईदरच्या मध्य भागात करा. म्हणजे मिरारोड ईस्ट आणि वेस्ट दोघांना उपयोगी पडतील. हा विषय पून्हा एकदा रितसर आणा. कारण त्यामध्ये तसंही करता येणार नाही. कारण सी.आर.झेड आहे. गव्हर्नमेन्टची परवानगी आणि इतरही गोष्टी लागणार आहेत. सी.आर.झेड मध्ये असताना अधिका-यांनी प्रस्ताव कसा दिला. हे एक प्रश्न चिन्ह आहे. सी.आर.झेड मध्ये करताच येणार नाही. आयुक्त साहेब, सी.आर झेड. प्रस्ताव आणला आहे तो कसा करता येईल त्याची आम्हाला माहिती दया.

**मदन उदितनारायण सिंह :-**

महापौराच्या परवानगीने बोलतो. महापौर साहेब एका बाजूने आपण चौपाटीवर कार्यक्रमास बंदी आणली आहे. भाईंदर पूर्वेला कुठलाही ग्राऊंन्ड किंवा मैदान नाही. आपले जे धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम होतात. भाईंदर पूर्वेचा मोठा परिसर आहे आणि जूनी वस्ती आहे. तिकडची लोक टॅक्स सुध्दा भरतात. टॅक्स भरणा-या लोकांना सामाजिक किंवा धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी आपण कुठलीही जागा प्राप्त केली नाही. चौपाटीची जागा त्याच्यासाठी होती. चौपाटीच्या जागेवरती आपण सी.आर.झेड च्या नावाखाली धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमास बंदी आणली आहे. आणि कलेक्टरकडे आपण परवानगी देऊ शकत नाही आणि एका बाजूला आपण खेळणी बसवण्याचा प्रस्ताव आणता. ह्या दोन्हीमध्ये दुमत का? ह्याचा अधिका-याने खुलासा करावा जर आपण कार्यक्रमाची परवानगी देऊ शकत नाही तर खेळणी बसवू शकतो का? आपल्या अधिकार क्षेत्रात आहे का? ह्याचा अधिका-याने खुलासा करावा.

**एस.ए. खान :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, हा जो विषय आलेला आहे स्पेसिफीक कुठल्या कुठल्या उद्यानात लावायचे. माझी अशी विनंती आहे की, सविस्तर गोषवारा देऊन त्याचा सर्व्हे करा कुठे कुठे लावता येते हा विषय पुढच्या सभेमध्ये गोषवारा देऊन त्याचा सर्व्हे करा कुठे कुठे लावता येते हा विषय पुढच्या सभेमध्ये घेण्यात यावा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

महापौर साहेब, पुढच्या वेळेस हा विषय महासभेत आणाल तेव्हा चौपाटीवर कार्यक्रमास बंदी केली तो विषय देखील महासभेत आणावा. त्याच्यावर खुलासा करावा आपले मत काय?

**मा. महापौर :-**

ठराव दुस-या मिटींगला घेण्यात येईल.

**प्रकरण क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, चौपाटी येथे इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५३ :-**

मरा भाईंदर महानगरपालिकेची उद्याने, चौपाटी येथे इलेक्ट्रॉनिक खेळणी बसविणे, याबाबत नेमकी कोणती मैदाने, कोणती उद्याने याच्या सविस्तर माहितीसह पुनःश्च हा विषय विषयपत्रिकेवर आणावा असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.५०, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी IPHS (इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅन्डर्डस्) नुसार आवश्यक पदनिर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. १९२, १९३ पेणकरपाडा गाव, मिरारोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय बांधण्यात आलेले आहे. सदर रूग्णालयाच्या कर्मचारी आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक जॉबप्र.२०००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३.१२.२००२ नुसार मा. महासभा दि. ०१.०७.२००८ (दि. १९.०६.२००८ तहकुब सभा) प्रकरण क्र. २४, ठराव क्र. २५ अन्वये ४५ पैकी ३५ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये सुचविलेला आकृतीबंध शहरी आरोग्य सेवांचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health Standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता, सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अशा अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता राखणे शक्य होणार नाही. तसेच रूग्णांच्या जीविताचा प्रश्न असल्याने याबाबत तडजोड करणे योग्य होणार नाही.

Indian Public Health Standards नुसार प्रत्येकी ८ खाटांमागे एका पाळीसाठी (८ तासांची पाळी) १ अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) आवश्यक आहे. तसेच एकूण अधिपरिचारिकांच्या २५ टक्के अधिपरिचारिका राखीव (Reserve) म्हणून असणे आवश्यक आहे. भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय ५० खाटांचे असल्याने सदर रूग्णालयासाठी Indian Public Health Standards नुसार व २५ टक्के राखीव पदे धरून २४ अधिपरिचारिका आवश्यक आहेत. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी ४ अधिपरिचारिका व ३ शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची पदे आवश्यक आहेत. तसेच सदर रूग्णालयात अहोरात्र अपघात विभाग चालविण्यासाठी तसेच वॉर्डमधील रूग्णांच्या देखभालीसाठी एकूण ६ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहेत. अशाप्रकार वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ६ पदे, अधिपरिचारिका यांची एकूण २८ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची एकूण ३ पदे आवश्यक आहेत. त्यापैकी वैद्यकीय अधिकारी यांची ४ पदे अधिपरिचारिका यांची १२ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांचे १ पद आधीच मंजूर असल्याने वैद्यकीय अधिकारी यांची २, अधिपरिचारिकांची १६ तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची २ पदे आवश्यक आहेत.

अशाप्रकारे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | १५६००-३९१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारिका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | ५२००-२०२०० | १८०० |

वरील प्रमाणे पदनिर्मिती करून स्थायी आस्थापनेवर उपरोक्त अधिकारी व कर्मचारी वर्गाची नेमणूक केल्यास त्यांच्या वार्षिक वेतनापोटी अंदाजे रू. ६०,५७,२४०/- खर्च अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे योग्य राहील. सदर पदांसाठी ठोक मानधन पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रस्तावित पद संख्या | प्रस्तावित ठोक मासिक वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | रू. २५,०००/- | रू. ६.०० लक्ष |
| २. | अधिपरिचारिका | १६ | रू. १२,०००/- | रू. २३.०४ लक्ष |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | रू. ६,०००/- | रू. १.४४ लक्ष |
| | एकूण | **२०** | | **रू. ३०.४८ लक्ष** |

वरीलप्रमाणे करारतत्वावर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नेमल्यास त्यांच्या ठोक मानधनासाठी प्रत्येक वर्षाकाठी रू. ३०.४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय येथे अखंडपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी प्रस्तावित पदे नमुद केलेल्या संख्येनुसार मंजूर करणेस, तसेच मंजूर पदांचा प्रस्ताव मा. शासनाकडे पद निर्मितीसाठी पाठविणेस, शासनाकडून पदमंजूरी मिळून स्थायी आस्थापनेवर पदे भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच स्थायी आस्थापनेवर पदभरती होईपर्यंत करारतत्वावर ठोक मानधनावर सदर पदे भरण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. तसेच उपरोक्त प्रस्तावास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपल्याकडे हे जे दिलेले आहे आपल्याला हॉस्पीटल चालू करायला पद निर्माण करायला लागतील. तर हा प्रस्ताव कोणी तयार केला आम्हाला माहिती देणार की अजून पदे ह्यासाठी लागणार आहेत. मा. आयुक्त साहेब, हे जे अजून पद लागणार आहेत तर तो प्रस्ताव कोणी तयार केला त्याची माहिती द्या.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. इंडीयन पब्लीक हेल्थ स्टॅन्डर्डस् ह्याच्यानुसार तयार केलेले आहेत. आपण ह्यापूर्वी जे ठराव केले होते.

**नरेंद्र मेहता :-**

गव्हर्नमेंटचे काय? शासनाचे जे धोरण होतं.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

ते ग्रामीण साठी होतं शहरासाठी नाही. जे स्टॅंडर्ड ५० बेडसाठी होते त्याप्रमाणे जी पद मंजूर झाली होती ती ग्रामीणसाठी होती आता हे शहरासाठी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हा प्रस्ताव कोणी तयार केला आपण की डॉक्टर साहेबांनी केला.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

डॉ. साहेबांनी.........

**नरेंद्र मेहता :-**

डॉ. साहेब आपण उत्तर द्या की ही पद लागणार आहेत का?

**डॉ. पडवळ :-**

हो एवढी पदे लागणार आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण मागच्या वेळी जो प्रस्ताव दिला होता तो चुकीचा होता का? महापौर साहेब विषय किती महत्वाचा आहे. बघा मी जेव्हा महापौर म्हणून निवडून आलो तेव्हा डॉ. पडवळ होते. त्यांनी ह्याच सगळ्या डॉक्टरांना प्रस्ताव दिला आणि आपणच त्याना निलंबीत करायला लावलं की ह्या डॉक्टरांची आवश्यकता नाही. त्यांना अनुभव नाही. म्हणून ही सभा त्यांना निलंबीत करते. म्हणजे ह्या डॉक्टर जेव्हा पहिल्यांदा प्रस्ताव केला त्यावेळी निलंबीत केलं आणि आज कित्येक वर्ष ते हॉस्पीटल चालू होत नाही मग त्यांनी पहिल्यांदा केलं ते चुकीचं आहे की, बरोबर आहे. आता त्याच व्यक्तीला ज्यांना निलंबीत केलं ह्याच कारणासाठी त्या पदाची डॉक्टर पॅटर्न ज्यावेळी स्टाफ पॅटर्न आपण आणली होती की ही स्टाफ पॅटर्न चालू करता येईल आपल्याला पद निर्मिती करायला लागतील. त्यावेळी आपणच त्यांना निलंबीत केलं की ह्यांना ज्ञान नाही त्यांच्यावर काय काय आरोप केले आणि आज तेच डॉक्टर विषय आणतात. म्हणजे आम्ही ह्यांच्या रिलाय राहायचं की नाही रहायचे आपण ह्याचा खुलासा करावा उपमहापौर जी आपण जी मागच्या वेळेला एवढी पद भरलेली आहेत. त्यांना आपण जून पासून पगार देतो जवळ जवळ १४ महिने होत आले आणि ह्यांचा उपयोग आपल्याला होत नाही. ह्याची आपण माहिती काढा आपण हे जे डॉक्टर अपॉईंट केले आहेत त्यांना काम नाही म्हणून प्रायव्हेट ठिकाणी प्रॅक्टीस करतात. पगार इकडून घेतात आणि प्रायव्हेट ठिकाणी प्रॅक्टीस करतात. सध्या हॉस्पीटल चालू झाली नाहीत म्हणून त्यांना काम नाही. १४ महिने बसून पगार देतो. साहेब करोडो रुपयाचं नुकसान

झालं आहे. हॉस्पीटल बांधायला दोन करोड खर्च झाले नाही आणि पगार दोन करोड देऊन झाले एकाचाही उपयोग झाला नाही. आतापर्यंत किती पगार दिला तोही खुलासा करावा आणि हे जे आपण आणलेलं आहे ते डॉ. पडवळांनी पहिलं आम्हाला दिलं होत तेव्हा ह्या सभागृहाने त्यांना निलंबीत केलेलं आहे तर आज पून्हा त्यांना निलंबीत करायचं का आम्ही?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त साो.) :-**

त्यावेळी परिस्थीती वेगळी होती कारण वेगळी होती.

**नरेंद्र मेहता :-**

काय परिस्थीती आणि काय कारण होती. अशी भाषा वापरु नका आपण सभागृहावर आरोप लावता.

**मदन उदीतनारायण सिंह :-**

परिस्थीती आणि कारणाचा उल्लेख करा.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त साो.) :-**

हा विषय वेगळा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाला पटले म्हणून त्यांनी ते केले परिस्थीती वेगळी होती परिस्थितीचे मिनिंग काय? सत्ताधारी आणि अपक्षाचा विरोध होता ती परिस्थीती असे तुमचे म्हणणे आहे का?

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त साो.) :-**

आजच्या विषयावर बोला.

**नरेंद्र मेहता :-**

परिस्थीती आणि कारणाचा उल्लेख करा.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त साो.) :-**

रुग्णालय सुरु करण्यासाठी पदे आवश्यक आहेत. त्यानूसार प्रस्ताव आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, ह्यांनी डायरेक्टली इनडायरेक्टली सभागृहावर आरोप लावलेला आहे. परिस्थीती वेगळी होती. परीस्थीतीचं मिनिंग काय हो. सभागृहात जेवढे सदस्य आहेत त्यांना जो पटेल शहराच्या हिताचा वाटेल तो निर्णय घेतील ह्यांना काय अधिकार आहे? आरोप करायला की परिस्थीती वेगळी होती.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, मागच्या वेळेला जो ठराव झाला त्यावेळेला सन्मा. नरेंद्र मेहता महापौर होते. त्यावेळी त्यांना आठवत असेल की डॉ. पडवळांनी जो प्रस्ताव आणला होता तो २०० बेडसाठी होता आणि २०० बेड प्रस्तावितच नव्हता कारण ते हॉस्पीटल ५० बेडच आहे म्हणून तो प्रस्ताव त्यावेळेला फेटाळला गेला. त्यानंतर आपण जे अप्रुवल दिलं आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये मिरारोड ग्रामीण क्षेत्रामध्ये येते. त्यानूसार जे वैद्यकीय अधिकारी होते त्या ग्रामीण भागाला जो डॉक्टरांचा रेट लागतो त्या हिशोबाने तो प्रस्ताव तयार केला होता. परंतु, आज अशी परिस्थीती आहे की, मिरा भाईंदर शहर पूर्ण ग्रामीण भागात असून देखील त्याच शहरीकरण झालेलं आहे. ते जे अधिकारी आहेत ते हॉस्पीटल चालवायला सफिशियन्ट नाहीत. डॉक्टर आणि नविन आयुक्तांनी डिसकस केलं आणि यु.डी. मधुन नविन डॉक्टर मागवून प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्यासाठी हा प्रस्ताव ह्याठिकाणी आणलेला आहे जे विषय नाही ना त्या विषयावर चर्चा करु नका.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी सुध्दा डॉक्टर पडवळांनी प्रस्ताव तयार केला होता ह्यांचे जे म्हणणे होते २०० बेड नाही सुधारणा करायला आलो असतील. आमचे असे म्हणणे आहे की, डॉक्टर पडवळनी जो प्रस्ताव दिला तो सक्षम आहे की असक्षम आहे.

**मा. महापौर :-**

आपण त्यावेळी तो प्रस्ताव आणला होता.

**नरेंद्र मेहता :-**

प्रस्ताव मी आणत नाही आपल्याला प्रशासन देते.

**मा. महापौर :-**

विषय ह्या ठिकाणी घेतला होता तो विषय फेटाळला होता. १० लोक कामाला लागणार होते. १०० लोकांची तुम्ही भरती करणार होते.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही जे करणार होते तेही सांगतो.

**मा. महापौर :-**

हा विषय मंजूर करण्यात आलेला आहे.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर साहेब, महापालिकेच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार केला असता जर भविष्यात आपण हॉस्पीटल खाजगीकरणाने देणार असाल तर ही पद निर्माण करणे योग्य आहे का? पालिकेची हॉस्पीटल

चालवण्याची परिस्थीती आहे का? सर्व आपण खाजगी करणाने देत आहोत कारण आपली आर्थिक परिस्थीती नाही आणि ही पद निर्माण करायची आणि भविष्यात हे हॉस्पीटल खाजगी चालवायला देणार असाल तर ही पद निर्माण करुन ह्यांना फुकट पोसणार अशी पालिकेची परिस्थीती होईल आणि सध्याच्या परिस्थीतीत पालिकेला डॉक्टर सुध्दा मिळत नाहीत.

**मा. महापौर :-**

एक व्यक्ती वाचावी हा आपला प्रयत्न आहे.

**प्रकाश दुबोले :-**

परंतु ह्यांना तुम्ही काढुन टाकणार नाही ना? ह्या डॉक्टरांना दोन चार वर्ष झाल्यानंतर काढणार आहात का? कोर्ट कचेऱ्या करत कोण बसणार आहे. जर तुम्ही भविष्यात खाजगीकरणाने देणार तर ही पद निर्माण करुन फायदा काय ते धोरण एकदा फायनल करा.

**मा. महापौर :-**

तुम्ही स्वतःहुन विचार केला का?

**नरेंद्र मेहता :-**

पानपट्टे साहेब, आतापर्यंत हॉस्पीटलला पगारावर किती खर्च झालेला आहे.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे दुसरा विषय घ्या.

**लक्ष्मण जंगम :-**

महापौर साहेब, ठराव झालेला आहे त्याला काय म्हणणं मांडायचं असेल तर ठराव मांडु द्या.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला दोन माहिती द्या की, हॉस्पीटल चालु करायला किती वेळ लागणार आहे आणि पगारामुळे किती खर्च झालेला आहे.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

इन्स्ट्रुमेंट खरेदी केली, पद मंजूर झाली, पद भरती सगळ्या गोष्टी एका टाईमात करु शकत नाही उरलेली पद भरतो.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर शहरात ३०० बेडचं हॉस्पीटल चालु झालं. आपल्या नंतर त्यांनी काम चालू केलं. हॉस्पीटल चालू आहे. आपण ४० बेडचं हॉस्पीटल चालवू शकलो नाही.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

आपली ही सरकारी संस्था आहे. त्याला शासनाची मंजूरी लागते.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही असक्षम आहात का? महानगरपालिका एक वर्षापासून पगार देते.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

आपण स्टेप बाय स्टेप भरतो ना.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही काय विरोध करत नाही जर त्यांना घरी बसून पगार द्यायचा आहे तर त्यांना आपण सहा महिन्यानंतर अपॉईंटमेंट दिलं असतं. आपण पगार देतो आणि हॉस्पीटल चालू होत नाही. नियुक्ती केली हॉस्पीटल चालू करायच्या एक दोन महिना अगोदर केली असती एक वर्ष अगोदर अपॉईंटमेंट कशी केली? ५० बेडच्या हॉस्पीटलसाठी आपण स्टाफ पॅटर्न नक्की केलेलं आहे.

**अनिल सावंत :-**

जो स्टाफ नेमणूक झालेला आहे तो तिथे काम करतो.

**नरेंद्र मेहता :-**

ज्या कामासाठी नेमणूक केली ते होत नाही ना.

**एस. ए. खान :-**

महापौर साहेब, चांगल काम होते ते ह्यांना बर वाटत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी निलंबीत केलं नसत तर हॉस्पीटल चालू झालं असत.

**जुबेर इनामदार :-**

तुमचं म्हणणं काय आहे.

**एस. ए. खान :-**

२०० खाटेचं प्रपोजल होता आता ५० खाटेचं आहे त्या हिशोबाने बरोबर आहे. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, ठराव वाचून कायम करण्यात यावा.

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, मी एक विनंती करतो मी महानगरपालिकेला एक लेटर दिले होते. आपले कोळी डॉक्टर आहेत ते पनवेलला राहतात आपल्या इकडे आणि ठाण्याला चार्ज आहे. शासनाने त्यांची नेमणूक केलेली आहे. ते कधीतरी पनवेलला जातात. तेव्हा इथे रोज एक दोन ॲक्सीडेंट असतात. त्यांना शवचिकित्सेसाठी यावे लागते पनवेल वरुन ते रिक्शा, बस पकडतात. तिकडून ठाण्यावरुन, भाईंदरला त्या माणसाची ३-४ तास जातात. ज्यांच ॲक्सीडंट वगैरे झालं आहे. त्याची पूर्ण कुटुंब डॉक्टराची वाट बघत बसतात ते आल्यानंतर ताबडतोब हात लावतात ती गोष्ट सत्य आहे. मी स्वतः तीन तास हॉस्पीटलमध्ये होतो. ते बोलले की माझ्याकडे गाडी नाही. आपल्या महानगरपालिकेकडे एवढ्या गाड्या आहेत. आयुक्तांना सुध्दा ती रिक्वेस्ट केली साहेब त्यांना एक गाडी द्या आपल्या डॉक्टरांकडे तीन गाड्या आहेत. एक माणूसकीच्या दृष्टीकोनातून त्यांना एक गाडी अवलेबल करुन द्या. मग ते ताबडतोब येतील. पानपट्टे साहेबांनी मला जवाब दिला ते नियमबाह्य आहे. कमिश्नरला जाऊन भेटलो. कमिश्नर साहेब सुध्दा बोलले की, हे नियमबाह्य आहे. पानपट्टे साहेब, हे काम तुम्ही नियमबाह्य करता.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त सा़ो.) :-**

कुठलं नियमबाह्य काम केलं सांगा. कुठलही नियमबाह्य काम महानगरपालिका करत नाही.

**मा. महापौर :-**

डॉक्टरांना मी उद्या बोलवून घेतो.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही रुलिंग द्या तुम्ही आयुक्तांना सांगा ना.

**मिलन म्हात्रे :-**

मिलन पाटील तुम्हाला विषय बरोबर मांडता आला नाही. आपल्या महापालिकेमध्ये जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहेत तसेच कोळी डॉक्टर प्रतिनियुक्तीवर आहेत जर प्रतिनियुक्तीच्या अधिकाऱ्यांना आस्थापनेकडुन गाड्या पुरवल्या जातात तर मग त्या व्यक्तीला का नाही?

**मिलन पाटील :-**

तुम्ही ह्यांना रुलिंग देऊ शकता ना. एखादं वाहन असेल तर उपलब्ध करुन द्या. हा प्रसंग माझ्यावर उद्या तुमच्यावर सुद्धा येईल.

**मा. महापौर :-**

आज डॉक्टर गाडी मागतो उद्या.............

**मिलन पाटील :-**

त्याची नेमणूक आहे. तोच करेल ना. दुसरा अप्रुव्हल करेल का? त्यालाच आपल्याला द्यायचं आहे. शहरासाठी काम आहे. तुम्हाला रुलिंग द्यायला एवढं काय?हॉस्पीटलचा विषय चालू आहे ना. तुमच्या पदाला हे शोभत नाही. साहेब, तुम्ही रुलिंग देऊ शकता.

**मिलन म्हात्रे :-**

वाईट अवस्था आहे.

**मिलन पाटील :-**

तुमच्यावर सुद्धा हा प्रसंग येणार आहे कोर्टाचे असे आदेश आहेत की एक गाडी चार जण वापरतात. आपले अधिकारी प्रत्येक जण एक गाडी घेऊन जातो. तुम्हाला एक रुलिंग देता येत नाही. तुम्ही ह्या गोष्टीला सक्षम नाहीत का? तुम्हाला ताकद नसेल तर सांगा मी गाडी पुरवीन की म्युनिसीपाल्टीची ताकद नाही मी पुरवीन तुम्ही फक्त रुलिंग द्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. मिलन पाटील ह्यांनी जी सुचना मांडली आहे त्यांना आपण परवानगी द्यायला पाहिजे त्यांची भावना आपण लक्षात घ्या त्यांची भावना ही शहरातील नागरीकांची भावना आहे. त्यांनी जी सुचना मांडली आहे की, ते डॉक्टरांना गाडी उपलब्ध करुन देतील तर त्यांना आमचं समर्थन आहे.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. १९२, १९३ पेणकरपाडा गाव, मिरारोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय बांधण्यात आलेले आहे. सदर रूग्णालयाच्या कर्मचारी आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक जॉबप्र.२०००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३.१२.२००२ नुसार मा. महासभा दि. ०१.०७.२००८ (दि. १९.०६.२००८ तहकुब सभा) प्रकरण क्र. २४, ठराव क्र. २५ अन्वये ४५ पैकी ३५ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये सुचविलेला आकृतीबंध शहरी आरोग्य सेवांचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health Standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता, सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अशा अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता राखणे शक्य होणार नाही. तसेच रूग्णांच्या जीविताचा प्रश्न असल्याने याबाबत तडजोड करणे योग्य होणार नाही.

Indian Public Health Standards नुसार प्रत्येकी ८ खाटांमागे एका पाळीसाठी (८ तासांची पाळी) १ अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) आवश्यक आहे. तसेच एकूण अधिपरिचारिकांच्या २५ टक्के अधिपरिचारिका राखीव (Reserve) म्हणून असणे आवश्यक आहे. भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय ५० खाटांचे असल्याने सदर रूग्णालयासाठी Indian Public Health Standards नुसार व २५ टक्के राखीव पदे धरून २४ अधिपरिचारिका आवश्यक आहेत. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी ४ अधिपरिचारिका व ३ शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची पदे आवश्यक आहेत. तसेच सदर रूग्णालयात अहोरात्र अपघात विभाग चालविण्यासाठी तसेच वॉर्डमधील रूग्णांच्या देखभालीसाठी एकूण ६ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहेत. अशाप्रकार वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ६ पदे, अधिपरिचारिका यांची एकूण २८ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची एकूण ३ पदे आवश्यक आहेत. त्यापैकी वैद्यकीय अधिकारी यांची ४ पदे अधिपरिचारिका यांची १२ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांचे १ पद आधीच मंजूर असल्याने वैद्यकीय अधिकारी यांची २, अधिपरिचारिकांची १६ तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची २ पदे आवश्यक आहेत.

अशाप्रकारे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | १५६००-३९१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारिका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | ५२००-२०२०० | १८०० |

वरील प्रमाणे पदनिर्मिती करून स्थायी आस्थापनेवर उपरोक्त अधिकारी व कर्मचारी वर्गाची नेमणूक केल्यास त्यांच्या वार्षिक वेतनापोटी अंदाजे रू. ६०,५७,२४०/- खर्च अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे योग्य राहील. सदर पदांसाठी ठोक मानधन पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रस्तावित पद संख्या | प्रस्तावित ठोक मासिक वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | रू. २५,०००/- | रू. ६.०० लक्ष |
| २. | अधिपरिचारिका | १६ | रू. १२,०००/- | रू. २३.०४ लक्ष |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | रू. ६,०००/- | रू. १.४४ लक्ष |
| | एकूण | **२०** | | **रू. ३०.४८ लक्ष** |

वरीलप्रमाणे करारतत्वावर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नेमल्यास त्यांच्या ठोक मानधनासाठी प्रत्येक वर्षाकाठी रू. ३०.४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय येथे अखंडपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी प्रस्तावित पदे नमुद केलेल्या संख्येनुसार मंजूर करणेस, तसेच मंजूर पदांचा प्रस्ताव मा. शासनाकडे पद निर्मितीसाठी पाठविणेस, शासनाकडून पदमंजूरी मिळून स्थायी आस्थापनेवर पदे भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच स्थायी आस्थापनेवर पदभरती होईपर्यंत करारतत्वावर ठोक मानधनावर सदर पदे भरण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. तसेच उपरोक्त प्रस्तावास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**प्रकरण क्र. ५० :-**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी IPHS (इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅन्डर्डस्) नुसार आवश्यक पदनिर्मितीच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. १९२, १९३ पेणकरपाडा गाव, मिरारोड येथे ५० खाटांचे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय बांधण्यात आलेले आहे. सदर रूग्णालयाच्या कर्मचारी आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक जॉबप्र.२०००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३.१२.२००२ नुसार मा. महासभा दि. ०१.०७.२००८ (दि. १९.०६.२००८ तहकुब सभा) प्रकरण क्र. २४, ठराव क्र. २५ अन्वये ४५ पैकी ३५ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयान्वये सुचविलेला आकृतीबंध शहरी आरोग्य सेवांचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health Standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता, सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अशा अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता राखणे शक्य होणार नाही. तसेच रूग्णांच्या जीविताचा प्रश्न असल्याने याबाबत तडजोड करणे योग्य होणार नाही.

Indian Public Health Standards नुसार प्रत्येकी ८ खाटांमागे एका पाळीसाठी (८ तासांची पाळी) १ अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) आवश्यक आहे. तसेच एकूण अधिपरिचारिकांच्या २५ टक्के अधिपरिचारिका राखीव (Reserve) म्हणून असणे आवश्यक आहे. भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय ५० खाटांचे असल्याने सदर रूग्णालयासाठी Indian Public Health Standards नुसार व २५ टक्के राखीव पदे धरून २४ अधिपरिचारिका आवश्यक आहेत. तसेच शस्त्रक्रिया गृहासाठी ४ अधिपरिचारिका व ३ शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची पदे आवश्यक आहेत. तसेच सदर रूग्णालयात अहोरात्र अपघात विभाग चालविण्यासाठी तसेच वॉर्डमधील रूग्णांच्या देखभालीसाठी एकूण ६ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहेत. अशाप्रकार वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ६ पदे, अधिपरिचारिका यांची एकूण २८ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची एकूण ३ पदे आवश्यक आहेत. त्यापैकी वैद्यकीय अधिकारी यांची ४ पदे अधिपरिचारिका यांची १२ पदे तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांचे १ पद आधीच मंजूर असल्याने वैद्यकीय अधिकारी यांची २, अधिपरिचारिकांची १६ तर शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर यांची २ पदे आवश्यक आहेत.

अशाप्रकारे भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | १५६००-३९१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारिका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | ५२००-२०२०० | १८०० |

वरील प्रमाणे पदनिर्मिती करून स्थायी आस्थापनेवर उपरोक्त अधिकारी व कर्मचारी वर्गाची नेमणूक केल्यास त्यांच्या वार्षिक वेतनापोटी अंदाजे रू. ६०,५७,२४०/- खर्च अपेक्षित आहे. वरीलप्रमाणे पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करारतत्वावर ठोक मानधनावर भरणे योग्य राहील. सदर पदांसाठी ठोक मानधन पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रस्तावित पद संख्या | प्रस्तावित ठोक मासिक वेतन | एकूण वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | रू. २५,०००/- | रू. ६.०० लक्ष |
| २. | अधिपरिचारिका | १६ | रू. १२,०००/- | रू. २३.०४ लक्ष |
| ३. | शस्त्रक्रियागृह सहाय्यक / परिचर | २ | रू. ६,०००/- | रू. १.४४ लक्ष |
| | एकूण | **२०** | | **रू. ३०.४८ लक्ष** |

वरीलप्रमाणे करारतत्वावर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नेमल्यास त्यांच्या ठोक मानधनासाठी प्रत्येक वर्षाकाठी रू. ३०.४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी भारतरत्न इंदिरा गांधी रूग्णालय येथे अखंडपणे वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी प्रस्तावित पदे नमुद केलेल्या संख्येनुसार मंजूर करणेस, तसेच मंजूर पदांचा प्रस्ताव मा. शासनाकडे पद निर्मितीसाठी पाठविणेस, शासनाकडून पदमंजूरी मिळून स्थायी आस्थापनेवर पदे भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच स्थायी आस्थापनेवर पदभरती होईपर्यंत करारतत्वावर ठोक मानधनावर सदर पदे भरण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. तसेच उपरोक्त प्रस्तावास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल पेमेंट किऑस्क प्रकल्पाद्वारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, स्थानिक संस्था कर वसुली व इतर सेवासुविधांच्या कार्यपध्दती राबविणेबाबत नेमलेल्या समितीच्या अहवालावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, आपण पैसे भरण्यासाठी किऑस्क लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता आपण टि.व्ही वर जाहीरात चालू आहे. आय.सी.आय.सी.आय बॅकनी प्रत्येक ठिकाणी आपल्या खर्चानी किऑस्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु त्यामध्ये टेलिफोन बिल असु द्या किंवा इलेक्ट्रीक बिल असू द्या, मोबाईल

बिल असू द्या. ते त्यांच्या खर्चाने आपल्याला मिळू शकते. त्यांच्याबरोबर टाईप केल तर महानगरपालिकेला खर्च करायची गरजच नाही. आयुक्त साहेब, प्रॉब्लेम काय आहे ते सांगा.

**राजकुमार घरत :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. ह्याच्यात आपण कृपया खर्च करणार नाही. महानगरपालिकेचा एकही रूपया खर्च होणार नाही. आपण फ्रंचायसी नेमणार फ्रेंचायसी स्वतःचा गाळा असणार. त्यांचा संगणक, प्रिंटर, इंटरनेट सुविधा सगळ त्याच्या स्वतःच असणार त्यासाठी त्याला आपण ०.५ टक्के............

**नरेंद्र मेहता :-**

तो खर्चच झाला ना. आपल्या टॅक्सचा रेव्हेन्यू साधारण ५० करोड रूपये आहे. २० करोड पाण्यात ७० करोड ते ०.५ तुम्ही देणार ना.

**राजकुमार घरत :-**

०.५ टक्के त्याला देणार.

**नरेंद्र मेहता :-**

०.५ किती झाले.

**राजकुमार घरत :-**

त्याच्यात एखाद्याच तीन हजार बील असेल तर महापालिकेला तीन हजार मिळतील ०.५ टक्के आहे ते ॲडिशनल.............

**नरेंद्र मेहता :-**

नागरिकांवर आता विषय महत्वाचा ठरला. आपण हे करतो सुविधासाठी. आपण नागरिकावर अजून भुर्दंड टाकतो की त्यांनी अर्धा टक्का जास्त भरावा. माझ्या बाजूला नगरपालिका आहे. मी अर्धा टक्का कशाला भरावा. आपली अभिनव शेतकरी शिक्षण संस्था त्याच दोन लाख रू. बिल आहेत. उदाहरण सांगतो त्याचा अर्धा टक्का मोजला तर एक हजार रूपये एक्स्ट्रा लागणार तुम्ही काय बोलणार पालिकेत जाऊन भर एक्स्ट्रा कशाला भरायचे ह्याच सुविधा आय.सी.आय.सी.आय. बॅक आपल्याला फुकट देते. म्हणजे नागरिकांवर आणि आपल्यावर देखील भुर्दंड नाही. आपण एखादी सुविधा द्यायची आणि नागरिकांकडून का अर्धा टक्का जास्त घ्यायचा. महापौर साहेब, आय.सी.आय.सी.आय. बॅक देत असेल तर आपल्याला प्रॉब्लेम काय आहे. तुम्ही त्यांना बोलवून घ्या. सेवाच द्यायची नाही. आपल्याला ते फुकटमध्ये देतात ते नको आणि नागरिकाना सांगायच अर्धा टक्का जास्त भरा हा पॅलिसी डिसीजन आहे. नागरिकांकडून करवाढ वाढवायची पाण्यामध्ये अर्धा टक्का वाढवायची हे आपल्याला किऑस्कच्या नावाखाली वाढवता येणार नाही. अर्धा टक्का वाढवायच असेल तर विषय आणायला लागेल. अर्धा टक्का घरी बसून वाढवू शकत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. नगरसेवक नरेंद्रजी ह्या ज्या संबंधी मिटींग झाल्या आहेत. त्या मिटींगला पदाधिकारी हजर होते. आपल्या माहीतीसाठी सांगतो की ह्या शहरातील सुशिक्षित तरूणांना रोजगार मिळावा हा त्या मागचा मोठा उद्देश आहे. ह्या शहरातील तरूणांनाच मिळणार. मग ते तुमचे कार्यकर्ते असतील.. इतर कोणाचेही असतील जे त्या त्याच्यामध्ये इनव्होल्वड होतील जे त्या नॉर्म्स मध्ये बसतील त्याच्यासाठी ही योजना अतिशय चांगली आहे. पैसे भरायला प्रभाग समितीमध्ये जातात. त्या प्रभागामध्ये जाण्या येण्यातच त्याचा ५,१०,२० रू. खर्च होतो. तेवढाच खर्च त्यांना तिकडे पडेल किंवा त्याच्यापेक्षा कमी पडेल हे तुम्ही लक्षात घ्या. बॅक जे करणार त्याच्यात त्यांचा स्वार्थ आहे. ते फुकटमध्ये करणार नाहीत. त्या माध्यमातून तरूणानाही रोजगार मिळेल. ह्याला कोणी विरोध करू नये.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही विरोध करत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्हाला आणखी माहीती हवी असेल तर देतो.

**नरेंद्र मेहता :-**

उपमहापौरजी आमचा विरोध नाहीत आहे. आपण ज्यावेळी तरूणांची गोष्ट करता. ज्यावेळेला आपल्याकडे फायरमध्ये २०० कर्मचारी भरले गेले. तेव्हा स्थानिक तरूणांचा विचार केला नाही. आणि किऑस्क अर्धा टक्का नागरिकांवर भुर्दंड टाकायचा त्यांनी अर्धा टक्का जास्त का भरायचे?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

भुर्दंड पडणारच. नागरिकांना जाण्या-येण्याचा खर्च होतोच ना.

**नरेंद्र मेहता :-**

अर्धा टक्का होत नाही. अर्धा टक्का असाच घरी बसवून वाढवायच.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

नरेंद्र मेहताजी ज्यांना भरायच आहे ते पालिकेत येऊन भरतील.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही अस वाढवूच शकत नाही ना. बिल देताना थोडच माहीती पडेल त्यांनी तिकडे भरायच नाही. इकडे भरायच आहे. काहीतरी विषय आणू नका. उगाच दिशाभूल करू नका. अर्धा टक्का टॅक्स का वाढवावा. आम्ही सुचना करतो विरोध करत नाही. महापौर साहेब, तुम्हाला नेहमी उलट समजते मग आम्हाला चेंज करायला लागते. पुन्हा कोर्टात जायच तक्रारी करायाच्या आम्हाला चेंज करायला लागते. नागरिकांना अर्धा टक्का का भरावा.

**मा. महापौर :-**

तक्रार करना आपका काम ही है।

**जुबेर इनामदार :-**

महापौर साहेब, सुचना चांगली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापालिकेला त्याच्यातून नुकसान होते.

**जुबेर इनामदार :-**

आय.सी.आय.सी.आय. बॅकने किऑस्क लावले आणि त्यांनी सुविधा पुरवली तर अति सुंदर. ज्या लोकांना आपल्या घराच्या खाली उतरून फ्रेंचायजीखाली पैसे द्यायची इच्छा असेल तर ते देतील. त्यांच्यावर जबरदस्ती नाही. जे चालून स्वतः किऑस्क पर्यंत जातील किंवा प्रभाग समितीमध्ये जातील त्यांनी तिथेच भरावे कारण तिथे त्यांना काहीच पैसे भरायची गरज नाही. ज्या फ्रेंचायसीला आम्ही देऊ त्यांना उत्पन्नाच सत्र झाल पाहीजे. कारण फुकटामध्ये कोणी करणार नाही. त्याच्याकरिता हे धोरण वाईट नाही. आय.सी.आय.सी. आय बॅक होने दो। एच.डी.एफ.सी. होने दो। सारे किऑस्क खोल कर बैठे है। और फुकट में करते है। तो उनका स्वागत है। लेकिन जो लोग लंबा ट्रॅव्हल नही करना चाहते और खुशी से ५ टक्के देते है तो दो। इस धोरण का क्या प्रॉब्लेम है।

**नरेंद्र मेहता :-**

अर्धा टक्का असा वाढवू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

वाढवत नाही. बऱ्याच जागेवरती लोक खाजगी स्वरूपात एम.टी.एन.एल. इलेक्ट्रीकची बिल भरतात. त्यांनी बोर्ड लावल आहे की, प्रत्येक बिलामागे आम्ही तुमच्याकडून १० रू घेऊ. अशा प्रकारच हे धोरण आहे. ज्यांची इच्छा आहे त्यांनी भरावे नाही तर जाऊन प्रभाग समितीमध्ये भरती.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी स्पष्ट म्हटल आहे की अर्धा टक्का त्यांना जास्त द्याव लागेल. महापौर साहेब ह्याच्यात म्हटल आहे की आठ नंबरमध्ये ह्याकरिता सदरला प्रत्येकी रक्कम ५ टक्का इतका सेवा आकार भरण्याकडून घेता येईल. ८ नंबर वाचा ना.

**जुबेर इनामदार :-**

बिलामध्ये वाढवता येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

हे कुठे वाढवणार ते सांगा. जो हॉरीझन्टल फेअर आहे तो भरणार आहेत.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब आपल जे धोरण आहे. ज्यांना सवलत घ्यायची असेल ज्यांना लवकर भरायचे आहे. ज्यांना जवळ जाऊन भरायचे आहे. ते सवलत घेतील आणि पैसे भरतील. बँकवाले का फुकट देतात कारण त्याच्यात एम.टी.एनएल. बिले, आणखी बिल असतात ते १०-२० रुपये घेतात आणि लोक खुशीने देतात. कारण लाईन लावायची नाही, रिक्षा पकडायची नाही. ते सगळे पैसे वाचतात. म्हणून जवळ जाऊन भरतात.

**जुबेर इनामदार :-**

उपायुक्त साहेब, एक स्पष्टीकरण करा की, आपण बिलामध्ये ५ टक्के जोडुन देणार आहोत का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नाही.

**जुबेर इनामदार :-**

जो किऑस्क वाला फ्रेंन्चायसीवाला असेल तो चार्ज करेल तो सांगेल की माझ्याकडे ५ टक्के जास्त द्यायला लागतील. हा प्रकार तसाच असेल ना.

**नरेंद्र मेहता :-**

प्रकरण क्र. ५१ मध्ये किऑस्क लावायला अर्धा टक्का नागरिकांकडून जास्त घ्यायला त्याला आम्ही विरोध करतो असा आम्ही ठराव मांडत आहोत.

**शरद पाटील :-**

माझ अनुमोदन आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा विषय कुठे आहे हे अवलोकन आहे.

**एस.ए.खान :-**

विकास म्हंटले की ह्यांचा विरोध.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ज्यांना कोणाला महापालिकेत भरायच असेल ते महापालिकेत भरतील.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मागच्या वेळी विषय आला होता की, किऑस्क लावायचा त्यासाठी समिती गठित केली आणि फायनल विषय आणला. आता ठराव करणार का आम्ही? त्या कमिटीने काहीही निर्णय घेतला तो आम्ही मानायचा.

**नगरसचिव :-**

हा अहवाल आहे तुमचा विरोध नोंदवा.

**नरेंद्र मेहता :-**

अहवाल नाही हा विषय आहे.

**मिलन पाटील :-**

ह्या ठरावाच्या बाजूने माझी एक सुचना आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा ठराव नाही.

**मिलन पाटील :-**

एक सुचना मांडतो. तुम्हाला योग्य वाटली तर घ्या. नाहीतर घेऊ नका. महापौर साहेब आपण जसे ड्राफ्ट काढायला जातो तर ड्राफ्टच्या अमाऊन्टवर बॅंक कमिशन घेतात. त्याप्रमाणे आपण काय घेणार? मोठा टॅक्स असल्यावर ही अमाऊन्ट जास्त होते. महापौर साहेब, ही अमाऊन्ट जास्त होते. तर मी काय सांगतो बिल व्हाईज घ्या ना. एक रूपया पासून १० रूपया पर्यंत अमूक एक स्लॅब व्हाईज घ्या. ५,०००/- असेल तर दोन रूपये लावा. त्याच एक्स्ट्रा ते भरतील. जशी बॅंक ड्राफ्टला एक्स्ट्रा अमाऊन्ट घेतात चेक किंवा कॅशचा वेगळी अमाऊन्ट घेते ड्राफ्ट पुरता कमिशन वेगळ घेते त्या पध्दतीने दोन रूपये एक बिलाच्या मागे घ्या. ही ०.५ मोठी रक्कम होऊन जाईल. मोठ्या टॅक्स मध्ये ही ०.५ मोठी रक्कम होऊन जाते. तुम्ही बिल व्हाईज घ्या. जर एखाद्याच ५०० रू. बिल असल तर त्याला ५० पैसे किंवा १ रूपया लावा किंवा १ रूपया पासून १० रूपया पर्यंत लावा. १० रूपये कोणाला भारी पडणार नाही. त्याच कमिशन बॅंक वेगळी घेईल. आपल्याशी काही संबंध नाही अशा पध्दतीने तुम्ही त्याच्यात सुधारणा करून घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब त्याच्यावर आपण रक्कम ठेवावी. १० रू. २० रू. अर्धा टक्का ठेऊ नका, आपल्याला विनंती आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब नागरिकोकी मुलभूत सुविधा देना महानगरपालिकाने सोचा है की, उनको घर के निचे सुविधा दे अच्छी बात है। ऐसे धोरण महानगरपालिका लाये। मिलन पाटील साहबने भी कहॉ निश्चित रक्कम करने के बाद उनको मिलता है। तो वो भी सोचेंगे की हमको ५ रू. १० रू. रिक्शा भाडा लगता है। वह भाडा न देके अगर वही पे हम भरते है तो हमको सुविधा मिलती है। तो जनता को अच्छा मेसेज मिलेगा।

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, मिलन पाटीलने जो विषय मांडला तो परफेक्ट विषय आहे. ज्याचा टॅक्स जास्त आहे त्याला ०.५ ने किती पैसे भरायला लागतील.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ज्यांना कोणाला ही अमाऊन्ट जास्त वाटते त्यांनी फ्रेचांईस कमी रेटने करावे.

**नरेंद्र मेहता :-**

आय.सी.आय.सी.आय. बॅंक फुकटमध्ये करते ना.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाला पहिल हे सांगू द्या की अर्धा टक्का रक्कम जास्त आहे ते ठिक आहे. ज्यांना ती सलवत घ्यायची आहे तेच घेऊ शकतात अस जर त्याच्यात असेल तर तुमची अमाऊन्ट दहा लाखाची आहे तर तुम्ही डायरेक्ट प्रभाग कार्यालयात भरा. जर तुम्हाला दोन्ही ऑप्शन असतील तर करायला काय हरकत आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी तिथे कराव आणि ज्यांना शक्य नाही ज्यांना पैसे वाचवायचे असतील त्यांनी प्रभाग कार्यालयामध्ये जाऊन कराव. तुम्ही जनतेच्या हितामध्ये करता आणि सभागृह करत नाही असा विषय नाही.

**शरद पाटील :-**

जंगम साहेबांनी फार चांगले सांगितल ज्यावेळेला तुम्ही ह्या सुविधा बाहेर कराल त्यावेळेला तुमच्या पालिकेचे कर्मचारी तिथे नसलेला असेल.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही लोकांच्या हितामध्ये रोज काम करता तुमच आम्ही अभिनंदन करतो.

**शरद पाटील :-**

ज्यांची अमाऊन्ट जास्त आहे त्यांना. ०.५ जास्त होते.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्याना अडचण नाही ते प्रभाग कार्यालयामध्ये भरतील.

**भगवती शर्मा :-**

आयुक्त साहब आपने जो प्रपोजल दिया है। उसमे क्या लिखा है। कमीत कमी एक संगणक, इंटरनेट सुविधा व एक प्रिंटर तसेच स्वतःची जागा, स्वतःचा दुकान गाळा असेल तर अस्तित्वातील दुकान गाळ्यात देखील सदर सेटअप करता येईल. साहब, एक दुकान की किंमत आप जोड रहे है की आधा टक्का की एक टक्का एक खुद की दुकान होनी चाहिए, उसके बाद प्रिंटर होना चाहिए, इंटरनेट का कनेक्शन होना चाहिए यह सबकी किंमत जोडोगे तो आपने जो आधा टक्का दिया है। वह भी उसको नही परवडेगा। आप हिसाब लगा लो। जो पुराने गाले है। पुराने जो टॅक्स धारक है। लेकिन नये जो टॅक्स धारक है। उनके उपर टॅक्स की अमाऊन्ट बहोत ज्यादा है। तो उनके उपर टॅक्स की अमाऊन्ट बहोत ज्यादा है। तो उनके उपर वह अमाऊन्ट बहोत ज्यादा होती है। तो मेरी एक सुचना है। मिलन पाटीलजीने जो सुचना दी है एक ठरावीक रक्कम एक बिल के प्रति कमर्शियल के लिए आप अलग ठहरा सकते है। रेसीडेन्शीयल के लिए अलग ठहरा सकते है। ठराव में निर्णय लेंगे। तो शहर के नागरिकोको अच्छी सुविधा मिलेगी।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्या मुद्दयावर नरेंद्र मेहता बोलतात की, बिलाच्या रकमेच्या ०.५ टक्के सेवा आपण देयक भरणाऱ्याकडून घेणार आहोत. आपण इतरांच्या भावना ध्यानात घेतल्या पाहिजे. त्याच्यात माझी एक सुचना आहे की बिलाच्या रकमेच्या ०.२५ टक्के करा. म्हणजे सगळ्यांच्या खिशाला परवडेल. आणि समाधानकारक रक्कम त्या फ्रेंचाइशाली मिळेल.

**नरेंद्र मेहता :-**

बॅकेत फुकट देतात ते घेत नाही. आणि ०.२५ काय करतो. तेच ठेवा ना. आणि बॅकेत ७० करोड रू. टर्न ओव्हर भेटतो आणि त्या ७० करोडवर इन्टरेस्ट मिळतो. प्रायव्हेट सेक्टरला इन्टरेस्ट भेटत नाही. त्या ७० करोडवर त्यांच लाखो रूपयाच इन्कम आहे. त्यासाठी ते फ्रि मध्ये करतात. जेवढी बॅकेची गॅरेन्टी असणार तेवढी ह्या खाजगीची नसणार. जर बॅक फुकट देते तर ०.२५ कशाला पाहिजे आपल्याला.

**लक्ष्मण जंगम :-**

लाईनला वेळ नको लागायला.

**नरेंद्र मेहता :-**

हे तर रेडी आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आपल्या प्रभाग कार्यालयामध्ये खूप मोठी लाईन होती. म्हणून ठिकठिकाणी ह्या प्रकारच करायच ठरवतो. बॅकेमध्ये किती लाईन असते.

**नरेंद्र मेहता :-**

बॅकेत नाही भरायचे. किऑस्क मध्ये टाकायचे आहेत. जेवढे आय. सी.आय.सी.आय. कडे किऑस्क आहेत तेवढे आपल्याकडे नाहीत. दुसरी गोष्ट ऑल ओव्हर इंडियामध्ये कुठेही भरू शकता. मुंबईला गेलात तर तिकडेही पैसे टाकू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

सुचना चांगली आहे. आय.सी.आय.सी.आय ला सौराष्ट्र करण्यात यावं. त्याच्याकडून फुकट सुविधा आपण घेऊ. आय.सी.आय.सी.आय किंवा कुठलीही जागतिक बँक असू दे. फुकट सुविधा मिळत असेल तर का सोडायची त्यांची सुचना चांगली आहे. सुचना घ्या धोरण जे ठरवायचं ते ठरवायचं.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मेहता साहेब आय.सी.आय.सी.आय बँक प्रत्येक कोपऱ्यावर उभ्या राहणार नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

एखादा माणुस ऑफिसला गेला तर त्यांना मुंबईत किंवा कुठेही टाकलं तरी ते इथे जमा होणार. इंडीयामध्ये कुठेही टाकलं तरी ते इथे जमा होणार त्याचा तो फायदा आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आय.सी.आय.सी.आय बँकेमध्ये पालिकेचं अकाऊंट आहे का? आयुक्त साहेब, आय.सी.आय.सी.आय ला फॅसिलिटी देण्यासाठी तुम्हाला अकाऊंट खोलायला लागेल त्यांचे जे हिडन चार्जेस

आहेत. कारण आय.सी.आय.सी.आय बँक फुकट देणार नाहीत. चेकबुक चार्जेस इतर वॉवचर चार्जेस कलेक्शन चार्जेस हे सगळं पालिकेला भरायला लागणार आहे. त्याचा विचार करा. आय.सी.आय.सी.आय कडुन प्रपोजल मागवा. आय.सी.आय.सी.आय बँक प्रायव्हेट बँक आहे. ती काही फुकट देणार नाही.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, मै सभागृह नेतासे निवेदन करुंगा की.................

**नरेंद्र मेहता :-**

पालिकेची मॅक्झीमम एफ.डी. प्रायव्हेट बँकेत आहे.

**भगवती शर्मा :-**

मेरा निवेदन है की जिस तरीकेसे कॅल्क्युलेशन लगाया जा रहा है पूर्ण रुप से हर चीज के अंदर मे चाहे प्रशासन हो या चाहे हम है पूर्ण रुप से तयार नही है। करदाता के उपर मे कितना पैसा देने के बाद उसको मुल सुविधा मिल सकती है। इसके लिए आपसे निवेदन है की, अगली महासभा मे पूर्ण कॅल्क्युलेशन के साथ मे पूर्ण विषय लाने की कृपा करे।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्या विषयाच्या संदर्भात जी चर्चा इथे झाली त्या चर्चेतून असा कोणताही बोध निघत नाही की लोकांना नागरी सुविधा देताना कोणता मार्ग अवलंबला पाहिजे. चालवणाऱ्याचा सुद्धा फायदा झाला पाहिजे ह्याची सखोल चर्चा पदाधिकाऱ्यांनी बसुन करावी संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील बोलवावे. त्याचसुद्धा मत घ्यावं आणि संपूर्ण विषयाचा उहापोह करुन पुढच्या वेळेला हा विषय व्यवस्थितरित्या सभागृहात सादर करण्यात यावा अशी मी विनंती करते.

**मा. महापौर :-**

माजी महापौर नरेंद्र मेहता ह्यांनी जो आय.सी.आय.सी.आय. बँकेचा जो विषय आणला आहे. ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपण हे नक्की केले आणि उद्या जाऊन १०-२० कोटी रुपये कर्ज घेतील की तुम्हाला मी एवढी कमाई करुन दिली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापालिकेच्या अधिकार आहे कमावण्याचा लोकांनी ह्यासाठीच निवडुन दिलं आहे. मी तर काहीतरी वाढवुन देतो आपण काय करता.

**मा. महापौर :-**

प्रभात पाटील ह्यांनी जी सुचना दिली आहे त्याचा फेरविचार करण्यात येईल.

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.५२, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १२/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- झंकार कंपनी जवळील कल्वर्टची रुंदी वाढविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब हा विषय नाही परंतु मला थोडसं बोलायचं आहे की आपण महासभेच्या माध्यमातुन बरेचसे विषय चर्चेला आणतो तसे निर्णय घेतो ठराव करतो त्या ठरावाचं पुढे काय होतं ते मला कधीच कळलं नाही. या विषयावर मी बऱ्याचदा बोललो आहे. मी सगळ्या विषयावर जात नाही परंतु आजही एक मुद्दा मला महत्वाचा वाटतो पावसाळा संपला असला तरीही कायम आपल्याला भेडसावणाऱ्या आहे ते म्हणजे या शहरामध्ये खुप जूनी घर आहेत. जून्या इमारती आहेत. ह्या जून्या घरांना आणि जून्या इमारतींना वाढीव एफ.एस.आय. देण्याच्या संदर्भात आपण एक ठराव केला होता. ह्या सन्मा. सदनाचे आपण बरीच वर्ष सदस्य आहोत. त्या ठरावाची आजची स्थिती काय आहे ते मला माहित नाही परंतु, मोडकळीस आलेल्या इमारतीचा प्रश्न आपल्याला प्रत्येक वर्षी भेडसावणार आहे. विकासक त्या बिल्डींग आहेत त्या स्थितीत बांधायला तयार होत नाही. कारण त्यांना काही फायदा होत नाही. अशा स्थितीत त्या इमारती कोसळल्या तर तिथल्या नागरीकांनी जावं कुठे आपण फार मोठ्या मनाने ठराव केला पण त्याच काय झालं त्याची माहिती दिली बरं होईल. ते पुढे चालवतात की चालवत नाही त्याची सभागृहाला माहिती द्यावी. विषय जरी नाही तरी मला हा विषय महत्वाचा वाटतो.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर शहरामधल्या ज्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या संदर्भात वाढीव एफ.एस.आय. देण्याचा जो ठराव झाला होता त्या ठरावानूसार सर्व कारवाई पूर्ण केलेली आहे. महापालिकेचा अंतिम ठराव होऊन प्रस्ताव गव्हर्नमेंटकडे सबमिट झालेला आहे. त्यामध्ये अे.डी.टी.पी. ठाणे, डेप्युटी डायरेक्टर ठाणे आणि डायरेक्टर यांचा रिपोर्ट गव्हर्नमेंटकडे गेलेला आहे. हा प्रस्ताव गव्हर्नमेंटकडे पेंडींग आहे. ह्याबाबत मा. महापौर साहेबांनी देखील दोन तीन वेळा मा. मुख्यमंत्र्यांना व्यवहार केला आहे. हा पाठपुरावा गव्हर्नमेंटकडे करण्यात येणार आहे.

**एस.ए. खान :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. टॅक्स भरण्याकरिता नागरीकांच्या सवलतीचा विषय जो होता. आमच्या प्रभाग समितीमध्ये बरीच गर्दी असते. बाजूलाच मोकळं मैदान आहे. तिकडे पार्किंग करण्यासाठी मोकळी जागा आहे तो गेट खोलत नाही त्यामुळे रस्ता पूर्ण ब्लॉक होऊन जातो. खुप मोठी रांग लागलेली असते. अपघात वगैरे झाला कोणी आतमध्ये घुसलं तर आतमध्ये भरपूर जागा आहे. आम्ही धनेगावे साहेब आणि आयुक्तांना सांगितले होते की गेट खोलून घ्या. तरी अजून तो गेट उघडला नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

जागेवर जाऊन बघुन घेतो माझ्या आणि सावंत साहेबांसोबत माझी सकाळी चर्चा झाली.

**एस.ए. खान :-**

साहेब, आजच्या आज बघुन घ्या मी प्रभाग अधिकाऱ्यांना सुद्धा सांगितलं आहे की तुम्ही वॉर्ड ऑफिसर आहात तुमचं काम आहे.

**जुबेर इनामदार :-**

समावेश आरक्षणावर बांधुन घेतलेली जागा आहे. त्याला पार्किंगची जागा पाहिजे..........

**एस.ए. खान :-**

आपण ऑफिस केलेलं आहे तिकडे पार्किंगची जागा पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग अधिकाऱ्याला गाडी उभी करायला जागा नसते.

**अनिल सावंत :-**

थिएटर चालवतात त्याला ओ.सी. नाही दिली.

**सत्यवान धनेगावे :-**

ओ.सी. नाही दिली.

**एस.ए. खान :-**

ओ.सी नाही दिली तर थिएटर चालू कसे झाले?

**सत्यवान धनेगावे :-**

४-५ वर्षापासून चालू आहे.

**एस.ए. खान :-**

मा. महापौर साहेब, ओ.सी. दिलेली नाही आणि थिएटर चालू आहे.

**अनिल सावंत :-**

आपण त्याच्याकडुन प्रॉपर्टी टॅक्स विथ पॅनल्टी घेतो.

**एस.ए. खान :-**

ओ.सी. जोडलेली नाही आणि थिएटर चालू आहे त्याची चौकशी करा.

**नरेंद्र मेहता :-**

किती लोकांना ओ.सी. द्यायची बाकी आहे त्याची माहिती द्या.

**भगवती शर्मा :-**

विषय काय आहे.

**एस.ए. खान :-**

विषय तो नव्हता परंतु टॅक्स भरण्याचा नागरीकांना सवलतीचा विषय आहे म्हणून सांगितलं.

**अनिल सावंत :-**

साहेब, आजच्या आज गेट ओपन करुन द्या.

**सत्यवान धनेगावे :-**

साईट इन्स्पेक्शन करुन त्याच्यावर आजच्या आज निर्णय घेतो.

**अनिल सावंत :-**

साहेब ती साईट बघितली आहे. नाही बघितली मग आज जाऊन बघु.

**एस.ए. खान :-**

आज बघुन घ्या आणि आजच्या आज निर्णय घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, हा जो विषय आहे. झंकार कंपनीची जी उघाडी आहे तो विषय मी दिड महिन्यापुर्वी आणला होता. पाऊस जरी संपत आला असेल तरी तो महत्वाचा विषय आहे. नॅशनल पार्कमधुन जे पाणी आपल्या शहरामध्ये येते चेकनाका ते काशीमिरा ह्या परिसरामधुन त्याला खाडीमध्ये मिळण्यासाठी दोनच रस्ते आहेत. एक मिरारोड मधुन जाफरी खाडी जाते ती आणि झंकार कंपनीजवळची जी उघाडी आहे ती. साहेब, आमची अशी मागणी आहे की जी झंकार जवळची उघाडी आहे ती भविष्यात ९ मीटर प्रस्तावित केली आहे आणि जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पाअंतर्गत किंवा एकत्रित नाले विकास प्रकल्पाअंतर्गत ती होणार आहे. माझी अशी विनंती आहे की, त्या प्रकल्पातुन उघाडीचं काम करुन आपल्या अर्थसंकल्पातुन करु शकलो तर ते

लवकर होईल. कारण मध्येच घटना घडली की, थोडासा पाऊस पडला तर त्या घरात ४-४ फुट पाणी जातं. आमच्या मनसेचे एक कार्यकर्ते अविनाश जागुष्टे त्या परिसरातले आहेत. त्या दिवशी पाणी साचल्यानंतर त्यांच्या वडीलांना त्या दिवशी शॉक लागुन निधन झालं कारण घरामध्ये पाणी साचलं होते. ह्या उघाडीचं काम ह्या अर्थसंकल्पातुन थोडी तरतुद आणि पुढच्या अर्थसंकल्पातुन थोडी तरतुद काढुन काम सुरु करावं अशी मी आपल्याला विनंती करतो आणि त्या विभागातील सगळेच नगरसेवक ह्या गोष्टीला सहमत असतील अशी मला आशा आहे.

**विजया वैती :-**

आम्ही पण सहमत आहोत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब आणि आयुक्त साहेब, त्याच्यामुळे काय होईल जर झंकारची उघाडी आहे ना ती जर ९ मीटर करु शकलो ना तर जाफरी नाला आहे. त्याच्यावरचा ताण कमी होईल. पूर्ण शांतीनगरपासुन दोन्ही ठिकाणी त्याचा फायदा होईल. तर आपल्याला विनंती आहे की, आपण ह्या अर्थसंकल्पातुन तरतुद करु शकलो तर करुन घ्यावी.

**मा. महापौर :-**

जाफरी खाडीत पाणी जाण्यासाठी अस्तित्व आहे का? पूर्वी जे बोरीवलीवरुन पाणी येत होतं ते मिरा गावाच्या पाठीमागुन जाफरी खाडीत जात होते. आम्ही नगरपालिका असताना आम्ही मागणी केली आहे. तरीसुध्दा प्रस्ताव पास झालेला नाही उघाड्या पास करुन आम्ही की ह्या उघाड्या अशाच असाव्यात.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तो जाफरी नाला आहे ना तो ८० फुटाची खाडी होती ती ८ फुट झालेली आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही नगरसेवक तिकडे असून सुद्धा तिकडे दुर्लक्ष करता.

**प्रशांत पालांडे :-**

अगोदरच झालेलं आहे.

**मा. महापौर :-**

लोकांनी भरणी केली तेव्हा तुम्ही दुर्लक्ष केलं.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब आपण बोला ना.

**मा. महापौर :-**

आणि दुसरी गोष्ट म्हणजे आता आम्ही असं ठरवलेलं आहे. जे नाले आता खोदलेले आहेत. पाणी जाण्यासाठी तो ठराव आपण कलेक्टरकडे प्रस्ताव दिलेला आहे की ह्या ठिकाणी ही जागा आहे ही नगरपालिकेकडे वर्ग करावी. जेणेकरुन हे नाले आपल्याला पक्के करता येतील.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आमची मागणी आहे की, झंकारची उघाडी आहे ना ती ९ मीटर प्रस्तावित आहे. ती आताच्या अर्थसंकल्पातून त्याची तरतुद करावी.

**मा. महापौर :-**

उघाडी प्रस्तावित केल्यानंतर पाणी जायला रस्ता तर पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

काय म्हणता साहेब.

**मा. महापौर :-**

झंकार कंपनी पुढे आहे रस्ता तर पाहिजे.

**सलिम शेख :-**

मा. महापौर साहेब, पुढचे नाले मोठे आहेत. उघाडी फक्त मोठी करा. ती उघाडी फार लहान आहे. १२ फुटाची उघाडी आहे. कमीत कमी ३० फुटाची व्हायला पाहिजे. महापौर साहेब, दोन वर्षा अगोदर झंकारची कंपनी तोडली होती. परंतु ती अर्धवट तोडुन तशीच ठेवली. तिकडे ते नाले मोठे केलेच नाहीत.

**मा. महापौर :-**

झंकार कंपनीने रस्ता बांधायला जागा दिली आता त्याच्याकडे मागणी केलेली आहे. १०-१५ फुटाची जागा आम्हाला रुंदीकरणासाठी दे म्हणून.

**सलिम शेख :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. प्रशांत पालांडेनी जो विषय आणलेला आहे. त्याच्यात उघाडी मोठी करायची आहे. फक्त मोठी करुन द्या ना आम्ही थोडीच म्हणतो..............

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, ह्याच्यापूर्वी सुद्धा आपण केलेलं आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. मधले काही प्रकल्प आपल्या अर्थसंकल्पातुन केले आहे. हे करायला काही हरकत नाही.

**मा. महापौर :-**

त्याचा विषय आहे त्यांना बोलू द्या.

**वंदना चक्रे :-**

त्यांच्या विषयाला धरुनच मी बोलते, सगळ्यात जास्त पाणी माझ्या वॉर्डात भरते जो झंकार नाल्याचा प्रश्न आहे. त्या तिकडनं पाणी इकडे येत. तिथे बऱ्याच लोकांनी भरणी केलेली आहे. आमची असं म्हणणं आहे की, सन्मा. प्रशांत पालांडे नी सांगितलं त्या पध्दतीने ते लवकरात लवकर करुन दिलं तर बर होईल. येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये लोक मारतील आम्हाला. आताच वाईट परिस्थीती होती की कंबरभर पाणी होतं २००५ मध्ये पाणी भरलं होतं त्याच्यानंतर आता वारंवार सांगून आम्हीसुद्धा खूप पत्रव्यवहार केले आहेत. हे जर नाही झालं तर पुढची परिस्थीती फार वाईट आहे. त्याच्यामुळे लोकं मरतात, पडतात. माझी आपल्याला विनंती आहे की हे झालं पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

प्रशांत पालांडे नी जो प्रस्ताव आणला आहे तो चांगला प्रस्ताव आहे. पण मला असं वाटते की, झंकार एकच उघाडी आहे असं नाही शहरात केवढ्या उघाड्या आहेत. संपूर्ण शहरात पाण्याचा प्रश्न आहे. शहरामध्ये अनेक उघाड्या आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

पाटील मॅडम आपण सगळ्या एकत्र करु शकत नाही एक-एक करुन करायला लागेल.

**प्रभात पाटील :-**

माझी प्रशासनाला विनंती आहे महापौर साहेब, तुम्हाला ही विनंती आहे. सगळ्या उघाड्याचे प्रस्ताव तयार करा. आपण एकावेळी सगळे नाही करु शकलो आपण टप्प्याटप्प्याने करु. परंतु सगळे प्रस्ताव तयार करा. संपूर्ण शहरामध्ये पाण्याचा प्रश्न आहे. हा विषय रितसर पटलावर आणा. सगळ्या उघाड्याचे प्रस्ताव तयार करुन पटलावर आणा आणि हा विषय शहराचा म्हणून करुन टाकू.

**प्रशांत पालांडे :-**

पाटील मॅडम तुमचे म्हणणे बरोबर आहे. हा एकात्मिक नाले विकास कार्यक्रमामध्ये हा आहे. आम्ही म्हणतो की त्यातनं काढुन आपल्या अर्थसंकल्पातून करा असं आम्ही म्हणतो. बाकी करु शकता परंतु एवढा ज्वलंत प्रश्न आहे की थोडासा पाऊस पडला की लोकाच्या घरात दोन-दोन, चार-चार फुट पाणी साचते बाकी तुम्हाला करायला हरकत नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, चार-चार वेळा लोकांचे संसार उध्वस्त झालेले आहे. तर ते करुन घ्या.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, ताईने जो भावना व्यक्त की है। विषय बहोत गंभीर है। उन्होंने कहाँ है झंकार के कारण से भी पानी भर रहा है। ऐसी स्थिति शहर मे काफी जगह है। और मेरे खयाल से एकात्मिक नाले की प्रकल्प की योजना है। वह मंजूर पे आ गई है। और एक अंतिम मिटींग लगेगी तो निश्चित रुप से आनेवाली बारीश के पहले जो खास-खास है इनका काम शुरु हो सकेगा। इसके लिए जल्द से जल्द एक मिटींग लगाके उसको मंजूरी दिलाए।

**विजया वैती :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, प्रभात ताई जे बोलल्या ते बरोबर आहे. कारण सगळ्या उघाड्या आहेत त्या रुंद करणे गरजेचं आहे. मी पत्रसुद्धा दिलेलं आहे आणि एवढ्या वर्षात पाऊस पडल्यावर कधी भरलं नाही ते आता भरलं का? तर ह्या भरणीमुळे जर नाले रुंद झाले तर पाण्याचा निचरा लवकरात लवकर होईल. कारण पाऊस पडला की पाणी हे भरणारच हे दरवर्षी ठरल्याप्रमाणे भरणारच त्यासाठी नाले रुंद करणं गरजेचं आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, एक मिनिट ऐकून तर घ्या.

**मा. महापौर :-**

मला ऐकायची गरज नाही. महाराष्ट्राचे सन्मा. मुख्यमंत्री त्यांच्याशी पत्र व्यवहार केला आहे.

**वंदना चक्रे :-**

असं बोलू नका. तुम्हाला ऐकायला लागेल. विषय फार गंभीर आहे. दिपक खांबित काय बोलतात ते ऐका.

**मा. महापौर :-**

तुमच्या मताशी मी सहमत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब मी ठराव वाचतो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. सर्व नगरसेवक मिरा भाईंदरमध्ये पाणी भरते ते विशिष्ट वॉर्डात भरत नाही ते संपूर्ण शहरामध्ये भरते. प्रभात ताईंनी जी माहीती सांगितली ती अतिशय चांगली आहे. संपूर्ण शहराचा अभ्यास करुन कुठे-कुठे पाणी साचणार नाही. आपलं शहर समुद्र किनारी आहे. परिस्थीती बदलत चालली आहे. प्रत्येक गोष्ट मुंबईवरुन येते.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक वेळेला ह्या विषयावर चर्चा असते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण पण इतके वर्ष इकडे आहात ना? त्याच्यावर मार्ग आपण सगळ्यांनी काढायचा आहे.

**शरद पाटील :-**

ते बरोबर आहे. दादा पण ते का होत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

एक नाला बंद केला किंवा मोठा केला म्हणून पाणी थांबणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, बराच फरक पडेल.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सगळ्या शहराच बघावे लागेल.

**दिपक खांबित :-**

झंकारची उघाडी जी आहे. ती रूंद करून काय फायदा होणार नाही. कारण पुढे झंकार कंपनी आहे. उघाडी रूंद होणार. परंतु पुढे जाऊन रस्ता लहान होणार. तिकडे एक मार्ग आहे. पुढे जे पुजा पार्कचा जो रस्ता आहे तिथे एक क्रॉसिंग करायची आणि तो नाला मोठा करून तो ह्याला मिळवायचा तर ते पाणी जाऊ शकते.

**प्रशांत पालांडे :-**

खांबित साहेब, ती झंकार कंपनी आहे. ती प्रफुल्ल नाल्यामध्येच येते.

**दिपक खांबित :-**

कुठली.

**प्रशांत पालांडे :-**

झंकार कंपनी. आपल्या योजनेमध्ये तो नाला मोठा दाखवलेला आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु तिकडे ॲप्रुपलाईनची बिल्डींग आहे. ती तुम्ही तोडणार का?

**प्रशांत पालांडे :-**

तो प्रस्तावित नाला दाखवला आहे.

**दिपक खांबीत :-**

ती आपण दोनदा तोडली आहे. त्याच्या पुढचा जो रस्ता आहे त्याला नाला मोठा करून न्यायचा.

**एस.ए.खान :-**

महापौरांच्या परवानगीने रस्ता जो आहे तो नंतर दाखवा ना....

**दिपक खांबीत :-**

त्या ठरावाची गरज नाही ना.

**एस.ए.खान :-**

ठरावाची काय गरजच नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर मनपा क्षेत्रामध्ये पावसाळ्यामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व परिसरातून वेगाने पाणी पश्चिम द्रुगती महामार्ग ओलांडून शहरामध्ये येते. या वर्षीच्या पावसामध्ये वनविभागातून येणारे पाणी महामार्गावर तर साचलेच परंतु महामार्गाच्या दोन्ही बाजुकडील नागरी वस्तीमध्ये घुसले. यास ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर झालेला अनधिकृत माती भराव व असमाधानकारक नालेसफाई हे कारण आहे. त्याचप्रमाणे पावसाच्या पाण्याचा वेगाने निचरा होण्याकरीता आवश्यक रुंद नाले व उघाड्या यांचा वनवा हे देखील आहे. या करीता कच्चे नाले रुंद व पक्के करणे व उघाड्यांची संख्या वाढविणे हे उपाय आवश्यक आहेत. परंतु हे सर्व एकाच वेळी करणे अत्यंत खर्चिक आहे व काम पुर्ण करण्यास बराव कालावधी लागणे शक्य आहे.

या करीता तातडीची उपाययोजना म्हणून झंकार कंपनी जवळील मिरा भाईंदर मार्गावरील कल्वर्टची रुंदी वाढविल्यास मिरागाव, अमिष पार्क, प्लीजंट पार्क, विजय पार्क इ. परिसराला त्याचा लाभ होईल व पाण्याचा निचरा वेगाने झाल्यास जाफरी नाल्यावरील ताण कमी होवून शांतीपार्क व शांतीनगर परिसरामध्ये पावसाचे पाणी साचण्याचे प्रमाण कमी होईल. सदरचा कल्वर्ट व झंकार नाल्यासह शहरातील इतर नाले

“एकात्मीक नाले विकास” प्रकल्पात समाविष्ट असून त्यास “महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान” कार्यक्रमाखाली शासनाकडील मंजुरी मिळणे बाकी आहे. मंजुरी मिळण्यास मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या करिता “एकात्मीक नाले विकास प्रकल्पातील”केवळ झंकार कंपनी जवळील कल्वर्ट वगळून त्याचे काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून करावे व या करीता आवश्यक असणारी कार्यवाही प्रशासनाने त्वरीत पूर्ण करुन शक्य असल्यास याच वर्षीच्या अर्थसंकल्पातून पुर्नविनियोजनाद्वारे अथवा पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतुद करुन कल्वर्टची रुंदी वाढविण्या बाबतचा रितसर प्रस्ताव प्रशासनाने पुढील मा. महासभेमध्ये मंजुरी करीता ठेवावा असा मी ठराव मांडीत आहे.

**एस.ए.खान :-**

झंकारचा स्टे हटला का? उघाडी मोठी करणार. परंतु पुढच्या पोर्शनच काय करणार?

**दिपक खांबीत :-**

ती बिल्डींग आहे. तिकडे होणार नाही. पुजा नगरचा आहे ना. तिकडे मोठा झाला की तिकडे क्रॉसींग करायची. ती मोठी करून काय फायदा. पुढे लहान आहे ना. ती बिल्डींग तुम्ही कशी तोडणार. उघाडी मोठी करून फायदाच नाही.

**वंदना चक्रे :-**

तुम्ही काय करणार. आपण म्हणता एवढी वर्ष झाली. वारंवार पत्रव्यवहार करतो.

**एस.ए.खान :-**

ठराव केलेला आहे.

**उमा सपार :-**

महापौर साहेब, माझ्या ५२ नंबर वॉर्डमध्ये उघाडीसाठी लेटर दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

रितसर विषय आणणार.

**(सभागृहात गोंधळ )**

**नयना म्हात्रे :-**

महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. राई, मोरवा आणि मुर्धा शिवाय पुढचीही गाव उत्तन, पाली, डोंगरी, महापौर साहेब आम्ही दर महिन्याला ऐकायच किंवा शिवमुर्ती नाईक देखील बोलायचे की, आपल्याकडे बसेस वाढल्या म्हणून त्या गेल्या कुठे. लोकांचे खूप हाल होतात. संध्याकाळी ७ नंतर स्टेशनवरून रिक्शा मिळत नाहीत. बस देखील सुटत नाही. लोकांनी जायचे कसे यायचे कसे. एखाद्या माणसाला भरपूर पगार असेल तो ५० रू. देऊन रिक्शाने येऊ शकतो. परंतु जे गरीब आहेत त्यांना परवडणार आहे का? लोकांनी किती हाल काढायचे. त्याच काय झाले ते उत्तर द्या. परिवहनच्या अधिकारी कोण आहेत त्यांना उत्तर द्यायला सांगा.

**मा. महापौर :-**

उत्तनला बस फिरवायला जागा आहे का?

**टेरी परेरा :-**

पण आम्हाला पाहीजे.

**मा. महापौर :-**

सर्व नगरसेवकांना मी विनंती करतो की, चौक, उत्तन, मोरवा, राई मुर्ध्याच्या बसचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी काही झाले तरी बस फोडतात. बसचे नुकसान करतात. त्यांना समजावू शकत नाही. त्या लोकांना समजवायला पाहीजे.

**सिसिलिया बावीघर :-**

त्याला कारण काय आहे? तुम्ही सर्व्हे करा. काय परिस्थिती आहे ती बघा.

**नयना म्हात्रे :-**

फिरवायला जागा नाही म्हणून बसेस कमी करायच्या का?

**मा. महापौर :-**

मोरवा पर्यंत बस सोडणार.

**नयना म्हात्रे :-**

मोरव्याची बस सुटली म्हणजे सर्व लोक स्टेशनला पोहोचली का? साहेब उत्तनला बस फिरवायला जागा नसेल तर बस कमी सोडायच्या का? साहेब हे उत्तर चुकीच आहे. हे उत्तर बरोबर नाही. लोकांचे हाल होतात. मी आयुक्तांना पत्र देऊन मोर्चा काढणार आहे.

**मा. महापौर :-**

मोरवा वरून बस सुटेल.

**नयना म्हात्रे :-**

ती बस मोरव्यालाच पॅक होते. राई मुर्ध्याच काय? मोरव्याची लोक स्टेशनला पोहोचली म्हणजे संपूर्ण मिरा भाईंदरची लोक स्टेशनला पोहाचली का? आम्हाला अशा बस पाहिजे की टाईमाला बस भेटली पाहीजे. सकाळी शाळेची मुल आहेत, कामाला जाणारी लोक आहेत. हे बरोबर आहे का? संध्याकाळी ७ ते ७.३० वाजता लोकांना रिक्शा मिळत नाहीत.

**मा. महापौर :-**

मोरव्यावरून मी सकाळी ७.०० वाजता बस सोडायला लावली. कारण सकाळी शाळेची मुल असतात.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही सोडायला नाही लावली. माझे लेटर गेल म्हणून.

**मा. महापौर :-**

कोणाकडून तरी काम झाले ना.

**नयना म्हात्रे :-**

एक बस सुटली म्हणजे काम झाल का?

**भगवती शर्मा :-**

उत्तन की भी बस की वही समस्या है।

**सिसिलीया बावीघर :-**

महापौर साहेब, वस्तुस्थिती काय आहे ती बघून घ्या. किती वेळ लागतो, बसमध्ये किती माणस भरतात, दोन बसची माणस एकाच बसमध्ये भरतात. पालीला आम्ही स्टॉपला असतो. तेव्हा बसमध्ये आम्हाला चढायला जागा नसते.

**टेरी परेरा :-**

उत्तनला जागा आहे ना. बाकीच्या बसेस फिरतात. बस वाढवून तरी द्या. शाळेची लहान मुल लटकून जातात. कुठे अपघात झाला, पडला तर कोण देणार त्याला परिवहनचे अधिकारी कोण आहेत त्यांना बोलवा.

**सिसिलीया बावीघर :-**

अधिका-यांना बोलवा. टाईम टेबल नाही काय नाही. प्रवाशांनी विचारायच कोणाला. अनाउन्समेन्ट नसते. एक बस भरली की त्यातून प्रवाशांना उठवतात आणि दुसरी बस चालली अस सांगतात. लोकांनी करायच तरी काय? अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी दोन-दोन तास तिथे थांबाव लागते. तिकडे सर्व्हे तरी करा. लोकांचे काय हाल होतात ते बघायला............

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, अमुक एक बस उत्तनच्या ह्याच्या वरून फिरवा. अमुक बस उत्तनच्या बाहेर रस्त्याला फिरवा. बसच तिकडे टायमिंग लावा. की ह्या बस ह्या टायमाला इथून सुटतील.

**सिसिलीया बावीघर :-**

त्यांनी टाईम टेबल लावलच नाही,

**मिलन पाटील :-**

परिवहनचे अधिकारी गेले कुठे?

**सिसिलिया बावीघर :-**

पाटील साहेब, जरी टाईम टेबल लावल ना तरी त्यांच्या हिशोबानुसारच ते बस सोडणार.

**मा. महापौर :-**

ह्या ठिकाणी उत्तन पासून, मोरवा, मुर्धा,राई इकडची गावे जी आहेत. उत्तनची जी परिस्थिती आहे. उत्तनला गाडी फिरवायला जागा नाही. जरा कुठल्या रिक्शाला लागल तर रिक्शावाला काचा तोडतो. चौकला ॲक्सीडंट झाल . चार बस तोडल्या. त्यांना नाकापेक्षा मोती जड झालेला आहे. त्यांना सेवा द्यायला परवडत नाही. बस फिरवायला जागा नाही. त्यामुळे तुमची बस सेवा कमी केलेली आहे. ह्या ठिकाणी मोरवा बस चालू केली. मोरव्याला बस भरते. आता बस वाढवूया.

**भगवती शर्मा :-**

मोरवा मे बस चालू नही है। इसलिए बोल रहा हूँ। चार दिन पहले मैने मोरवा के लोगो को कमिशनर के पास लेके गया था। टाईम टेबल के साथ लेके गया था। एक टाईम टेबल दिया था। यह बसेस सुबह इतना बजे, दोपहर के टाईममें बस चल ही नही रही है। परिवहन अधिकारी कमिशनर के सामने बैठा था।

**मा. महापौर :-**

स्कूल के बच्चे रोज जाते है। आप ऐसी क्या बात कर रहे है।

**भगवती शर्मा :-**

साहब, बोल रहे है। बस चल रही है। मै आपको मोरवा गॉव की आज की सुचना देता हूँ।

**मा. महापौर :-**

मैं अधिकारी को बुलाता हूँ।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्या अधिका-यांना तुम्ही विचारा? की, तुम्ही डायसवरून का गेले? त्यांना तुम्ही पहिली पनिशमेंन्ट करा,

**नरेंद्र मेहता :-**

ह्याच सभेमध्ये मागच्या वेळेला ओमप्रकाशजीने बस सेवा संदर्भात विषय आणला होता. त्यावेळेला सन्मा. भगवती शर्मा बोलले आमची लक्षवेधी घ्या. आणि आज बोबंलतात. त्यावेळी रितसर पटलावर विषय आणला होता. त्यावेळी आपण घेतला घेतला नाही.

**मिलन पाटील :-**

आमच्या सुचना सांगतो ना. उत्तनला बसचा भयंकर त्रास होतो. कामावर जाणा-या आणि मुलांना देखील त्रास होतो. बस डेपोमध्ये रिक्शा उभ्या राहतात. पोलिसांना तुम्ही लेटर द्या. त्या रिक्शा मागे क्रॉसिंग आहे तिथे रिक्शा ठेवा. म्हणजे फिरवण्याचा काय प्रश्न येणार नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

मिनिमम रिक्शा ठेवायला सांगा. २०-२० रिक्शा लावतात.

**मिलन पाटील :-**

काही बस आहेत त्या गावाच्या बाहेरून द्या. त्याच टाईमिंग तिकडे लिहा. ह्या टायमामध्ये ह्या ठिकाणाहून बस सुटतील. तिथे जर लोक आली नाही तर लोकांची चुक आहे. आता तुम्ही सांगा काय आहे ते.

**सिसिलीया बावीघर :-**

तुम्ही सांगितलेल की टाईम टेबल देणार ते कुठे गेल.

**याकुब कुरेशी :-**

महापौर साहेब, हा विषय आहे का? विषय पटलावर जे विषय आहेत ते पहिले घ्या. नंतर तुम्ही मांडा.

**सिसिलिया बावीघर :-**

साहेब आमची ती अडचण आहे. आमच्या उत्तनच्या लोकांचे काय हाल होतात ते बघा तुम्ही. विषयनाही विषय नाही म्हणजे काय करायच. लोक आमच्याकडे तक्रार घेऊन येतात त्यांना काय उत्तर द्यायच.

**आसिफ पटेल :-**

सचिव साहेब, कुठला विषय आहे.

**सिसिलिया बावीघर :-**

तुम्हाला माहीत असेल ना. चार बस का तोडल्या? तुम्हाला, ते पण माहीत असेल की कोणी जाणून बुजून तोडल्या नाहीत. एक मुलगा जागच्या जागी ठार झाला.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहरात पावसाळ्यात सर्वत्र पाणी साचुन तसेच संजय गांधी उद्यान परिसरातून पाणी येऊन शहरात जलमय परिस्थिती निर्माण होते. शहरातून पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद नाले व उघाड्या यांची शहरात उणीव दिसून येते. हे शहर खाडी लगत असल्याने भरतीच्या वेळी पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होतो.

या करीता शहरात कच्चे पक्के नाले वाढवणे, उघाड्या वाढवीणे व दुरुस्त्या करणे हे उपाय आहेत. केवळ एखादी उघाडी किंवा नाला मोठा वा रुंद करुन हा प्रश्न सुटणार नाही करीता या संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन त्याचा अहवाल मा. महासभे पुढे सादर करण्यात यावा. ह्या शहराचा सर्व्हे एखाद्या नामांकित एजन्सी मार्फत करण्यात यावा आणि तो मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा व त्यानुसार ह्या शहरातील पावसाच्या पुराचा पाण्याचा प्रश्न निकालात काढण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

अभी सावंत साहब को दो मिनट बोलने दो उसके बाद आप मिटींग लगाके इसका निराकरण किजीए।

**नगरसचिव :-**

पिठासिन अधिका-यांच्या परवानगीने प्रकरण ५२ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत पालांडे व अनुमोदक श्री. प्रविण पाटील यांचा आहे. दुसरा ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील अनुमोदक श्रीम. वंदना चक्रे यांचा आहे. अनुक्रमे मिरा भाईंदर शहरात पावसाळ्यात सर्वत्र पाणी साचुन तसेच संजय गांधी उद्यान परिसरातून पाणी येऊन शहरात जलमय परिस्थिती निर्माण होते. शहरातून पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद नाले व उघाड्या यांची शहरात उणीव दिसून येते. हे शहर खाडी लगत असल्याने भरतीच्या वेळी पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होतो.

या करीता शहरात कच्चे पक्के नाले वाढवणे, उघाड्या वाढवीणे व दुरुस्त्या करणे हे उपाय आहेत. केवळ एखादी उघाडी किंवा नाला मोठा वा रुंद करुन हा प्रश्न सुटणार नाही करीता या संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन त्याचा अहवाल मा. महासभे पुढे सादर करण्यात यावा. ह्या शहराचा सर्व्हे एखाद्या नामांकित एजन्सी

मार्फत करण्यात यावा आणि तो मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा व त्यानुसार ह्या शहरातील पावसाच्या पुराचा पाण्याचा प्रश्न निकालात काढण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. पहिल्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर मनपा क्षेत्रामध्ये पावसाळ्यामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व परिसरातून वेगाने पाणी पश्चिम द्रुगती महामार्ग ओलांडून शहरामध्ये येते. या वर्षीच्या पावसामध्ये वनविभागातून येणारे पाणी महामार्गावर तर साचलेच परंतु महामार्गाच्या दोन्ही बाजुकडील नागरी वस्तीमध्ये घुसले. यास ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर झालेला अनधिकृत माती भराव व असमाधानकारक नालेसफाई हे कारण आहे. त्याचप्रमाणे पावसाच्या पाण्याचा वेगाने निचरा होण्याकरीता आवश्यक रुंद नाले व उघाड्या यांचा वनवा हे देखील आहे. या करीता कच्चे नाले रुंद व पक्के करणे व उघाड्यांची संख्या वाढविणे हे उपाय आवश्यक आहेत. परंतु हे सर्व एकाच वेळी करणे अत्यंत खर्चिक आहे व काम पुर्ण करण्यास बराव कालावधी लागणे शक्य आहे.

या करीता तातडीची उपाययोजना म्हणून झंकार कंपनी जवळील मिरा भाईंदर मार्गावरील कल्वर्टची रुंदी वाढविल्यास मिरागाव, अमिष पार्क, प्लीजंट पार्क, विजय पार्क इ. परिसराला त्याचा लाभ होईल व पाण्याचा निचरा वेगाने झाल्यास जाफरी नाल्यावरील ताण कमी होवून शांतीपार्क व शांतीनगर परिसरामध्ये पावसाचे पाणी साचण्याचे प्रमाण कमी होईल. सदरचा कल्वर्ट व झंकार नाल्यासह शहरातील इतर नाले ''एकात्मीक नाले विकास'' प्रकल्पात समाविष्ट असून त्यास ''महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान'' कार्यक्रमाखाली शासनाकडील मंजुरी मिळणे बाकी आहे. मंजुरी मिळण्यास मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. या करिता ''एकात्मीक नाले विकास प्रकल्पातील''केवळ झंकार कंपनी जवळील कल्वर्ट वगळून त्याचे काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून करावे व या करीता आवश्यक असणारी कार्यवाही प्रशासनाने त्वरीत पूर्ण करुन शक्य असल्यास याच वर्षीच्या अर्थसंकल्पातून पुर्नविनियोजनाद्वारे अथवा पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतुद करुन कल्वर्टची रुंदी वाढविण्या बाबतचा रितसर प्रस्ताव प्रशासनाने पुढील मा. महासभेमध्ये मंजुरी करीता ठेवावा असा मी ठराव मांडीत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. प्रभात पाटील ह्यांनी जो ठराव मांडला. त्याच्या ठरावाला ४३ मते व विरोधात १४ मते पडली. सन्मा. प्रभात पाटील ह्यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात आलेला आहे. सन्मा. प्रशांत पालांडे ह्यांचा ठराव ४३ मतानी फेटाळला आहे. आपल्या माहीतीसाठी सांगतो. एकात्मीक नाले प्रकल्प मी सातत्याने त्याचा पाठपुरावा केलेला आहे. शासनाकडे जे.एन.एन.यु.आर.एम त्या योजने अंतर्गत त्या ठिकाणी ३०० कोटी रू. मागणी केलेली आहे. आणि त्याची मंजुरी अंतिम टप्प्यावर आलेली आहे. परवाच मा. मुख्यमंत्र्याकडे मिटींगला गेलो होतो. उद्या पेपरला माझा फोटो दाखवीन. सगळ्या सह्या झालेल्या आहेत.

**शरद पाटील :-**

महापौरांचे अभिनंदन. सगळे नाले झाले आणि मिरा भाईंदरला पाणी भरायचे बंद झाले तर तुमच नाव सुवर्ण अक्षरात लिहू.

**मा. महापौर :-**

पाणी जेव्हा भरले होते तेव्हा मी एकटा माणूस फिरत होतो. आपल्याच लोकांनी भरणी करून नाले बंद केलेले आहेत. हा तुम्ही गुन्हा केला.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब, अपने उत्तन की एक लडकी हेमा नाझरेथ भंगा जो सप्टेंबर २०११ मे न्यूयॉर्क अमेरिका एक प्रतियोगिता हुई थी। जागतिक पोलीस आणि फायर गेम्स स्पर्धा उसमे ४ X १०० मिटर, २०० मिटर, वैयक्तिक स्वर्ण पदक व तसेच चार १०० मिटर रिलेमें तीन स्वर्ण पदक जिते थे। यह शहर के लिए एक गौरवशाली बात है। दुर्भाग्य यह है की, इस सदम नें उस बारे में कुछ चर्चा नही किया। मैंने आपको एक पत्र भी दिया है। अगली महासभा में निश्चित रूपसे उसको बुलाकर के उसका सम्मान करेंगे। उसके बारे में थोडीसी जानकारी देना चाहता हूँ। आज तक उन्होने २१ पदक इस शहर के लिए जिते है। जिसमे १२ स्वर्ण पदक जिते है। ६ रौप्य पदक जिते है। और तीन कास्य पदक जिते है। अगली महासभा में निश्चित रूपसे उसको बुला के एक भव्य सम्मान किया जाए ताकि इस शहर के लिए यादगार क्षण लिखे जाऐंगे। ऐसी मैं सुचना करती हूँ।

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, सालाबाद प्रमाणे आपण एस.एस.सी. आणि बारावीच्या विद्यार्थ्याचा सत्कार करतो. या वर्षी चार महीने उलटून गेले अजूनही त्या मुलांचा सत्कार नाही. त्या मुलांचे पालक आम्हाला विचारतात की, आमच्या मुलांचा सत्कार कधी आहे. आपण जो गुणगौरव दरवर्षी घेतो. त्याप्रमाणे घ्यायलाच पाहीजे. आज चार महिने उलटून गेले तरी त्या गोष्टीचा आपण पाठपुरावा करत नाही. महापौर साहेब तुम्ही रूलिंग द्या.

**मा. महापौर :-**

शिक्षण मंडळ आहे. त्याच्याकडे विषय झालेला आहे. तो त्यांचा विषय आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही मागवा ना. त्याचे अधिकारी असतील ना. अधिकाऱ्याकडून माहीती घ्या.

**प्रकरण क्र. ५२ :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १२/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- झंकार कंपनी जवळील कल्वर्टची रुंदी वाढविणे बाबत.

**ठराव क्र. ५५ :-**

मिरा भाईंदर शहरात पावसाळ्यात सर्वत्र पाणी साचुन तसेच संजय गांधी उद्यान परिसरातून पाणी येऊन शहरात जलमय परिस्थिती निर्माण होते. शहरातून पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद नाले व उघाड्या यांची शहरात उणीव दिसून येते. हे शहर खाडी लगत असल्याने भरतीच्या वेळी पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होतो.

या करीता शहरात कच्चे पक्के नाले वाढवणे, उघाड्या वाढवीणे व दुरुस्त्या करणे हे उपाय आहेत. केवळ एखादी उघाडी किंवा नाला मोठा वा रुंद करुन हा प्रश्न सुटणार नाही करीता या संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन त्याचा अहवाल मा. महासभे पुढे सादर करण्यात यावा. ह्या शहराचा सर्व्हे एखाद्या नामांकित एजन्सी मार्फत करण्यात यावा आणि तो मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा व त्यानुसार ह्या शहरातील पावसाच्या पुराचा पाण्याचा प्रश्न निकालात काढण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | राजु यशवंत भोईर | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | सिंह मदन उदितनारायण | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | पाटील शरद केशव | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ८ | कुरेशी याकुब ईस्माईल | ८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | मुंज वासुदेव भास्कर | | | |
| १७ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १८ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| १९ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २० | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २३ | भट दिप्ती शेखर | | | |
| २४ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलिम दाऊद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| २९ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | | | |
| ३३ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३४ | पाटील मिलन गोविंदराव | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३६ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | | | |
| ३७ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | | | |
| ३८ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ३९ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४० | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४१ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४२ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४३ | टेरी पॉल परेरा | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचे दिनांक १२/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- पयुर्षण सनात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन) शॉप बंद ठेवणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब, उसी विषय मे अगस्त महीने मे एक लक्षवेधी मैंने रखी थी। उस समय लक्षवेधी पे जो चर्चा हुई थी। आपने शासन के जी.आर. के हिसाबसे निर्णय दिया था। उसका पालन किया जाना चाहिए। और निश्चित रूपमें उसका पालन किया था।

**रामनारायण दुबे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व धर्मांचे नागरीक राहत आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणे जैन समाज आहेत. जैन समाज दरवर्षी मोठ्या उत्साहाने पयुर्षण सण साजरा करतात. पयुर्षण हा ८ दिवसांचा सण असतो.

महाराष्ट्र शासनातर्फे राज्यात पयुर्षण सणात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन शॉप) बंद ठेवावे असे आदेश आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील जैन समाजाची भावना आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात पयुर्षणचे ८ दिवस कत्तलखाने बंद ठेवावे. जेणे कारणे या शहरात पशु / जीव हत्या होणार नाही व जैन धर्माचे पालन देखील होईल.

वरील विषयासाठी भविष्यात जेव्हा जैन धर्माच्या पयुर्षणाचा सण असेल तेव्हा त्या सणाच्या ८ दिवस दरवर्षी मिरा भाईंदर शहरातील कत्तलखाने बंद ठेवावेत असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, प्रस्ताव कोणाचा आणि ठराव कोण वाचतो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

नरेंद्र मेहता तुम्ही हजर आहात. तुम्ही तुमच्या विषयावर बोला. जैन धर्माशी संबंधीत विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही दरवर्षासाठी ठराव मांडलेला आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब ''ज'' च्या प्रस्तावामध्ये प्रोव्हीजन काय आहे प्रस्ताव कोणाचा आहे.

**नगरसचिव :-**

ज्याचा प्रस्ताव आहे त्यानेच मांडायचा असतो.

**अनिल सावंत :-**

मग दुसऱ्यांनी ठराव कसा मांडला माजी महापौर आहेत त्यांना माहित नाही का?

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व धर्मांचे नागरीक राहत आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणे जैन समाज आहेत. जैन समाज दरवर्षी मोठ्या उत्साहाने पयुर्षण सण साजरा करतात. पयुर्षण हा ८ दिवसांचा सण असतो.

महाराष्ट्र शासनातर्फे राज्यात पयुर्षण सणात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन शॉप) बंद ठेवावे असे आदेश आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील जैन समाजाची भावना आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात पयुर्षणचे ८ दिवस कत्तलखाने बंद ठेवावे. जेणे कारणे या शहरात पशु / जीव हत्या होणार नाही व जैन धर्माचे पालन देखील होईल.

वरील विषयासाठी भविष्यात जेव्हा जैन धर्माच्या पयुर्षणाचा सण असेल तेव्हा त्या सणाच्या ८ दिवस दरवर्षी मिरा भाईंदर शहरातील कत्तलखाने बंद ठेवावेत असा मी ठराव मांडत आहे.

**रामनारायण दुबे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

महापौर साहेब, ठराव दोन झाले ह्यांनी ठराव मांडला तो जैन समाजाचा कि काय म्हणायचं आहे.

**रामनारायण दुबे :-**

ठराव वापस लेता हूँ।

**नरेंद्र मेहता :-**

दोन्ही ठराव घ्या दोन्ही एकत्र करा.

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी दिलेल्या प्रस्तावामध्ये जी तारीख आहे ती गेली. ३० ऑगस्टपर्यंत होती.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मागच्या महासभेमध्ये ह्या विषयावर सन्मा. भगवती शर्मा लक्षवेधी झाली आणि त्या वेळेस शासनाने जो नियम बनवला आहे. त्या नियमाला अनुसरुन झाले आहे. त्या नियमाच्या पलिकडे आपण जाऊ शकत नाही. त्याच्यामुळे त्या ठरावाला तसा काय अर्थच नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

शासन को अभिनंदन देता हूँ की पजेशन के टाईम उन्होंने अच्छी सेवा बजाई थी। और कत्तलखाना बंद रखा था। मै अभिनंदन करता हूँ।

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब ठराव मांडला आहे काय प्रकरण.............

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब कोणी सांगितलं मंजूर झाला.

**जुबेर इनामदार :-**

शासनाच्या जी.आर. ला तुम्ही ठराव कसा करणार.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी चुकीचा ठराव मांडला तुम्ही कशी परमिशन दिली मग तुम्ही काय बोलता.

**नगरसचिव :-**

परमिशन पिठासीन अधिकारी देतात.

**एस.ए. खान :-**

जी.आर आहे ना मग ठरावाची गरज काय? वेळ संपलेली आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, एखाद्या विषयावर एका सभेमध्ये चर्चा झाली तिथे लक्षवेधी आली. त्याच्यावर चर्चा झाली त्याच्यावर अंमलबजावणीही झाली मग परत कोणता ठराव करता.

**मा. महापौर :-**

हा ठराव जैन लोकांना दाखविण्यासाठी चालला आहे. आम्ही जैन लोकांच्या बाजूने आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, शब्द मागे घ्या. तुम्हाला बोलायचा अधिकार आहे. आम्हाला ठराव मांडायचा अधिकार आहे. आम्ही ठराव मांडला. आपण त्याच्यावर निर्णय द्यायचा तो द्या. आम्ही काय करतो ते तुम्हाला सांगायची गरज नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

नरेंद्र मेहता साहेब हा विषय आता संपलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी एक क्लिअर करतो की, हा ठराव ह्या वर्षासाठी नाही तर तो दरवर्षासाठी आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या ठरावाला माझा विरोध आहे. ह्या शहरामध्ये सर्व धर्माचे लोक राहतात. आम्ही नॉनवेज खाणारे आहोत. आमच्यावर कोणी अत्याचार करु शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी कुठे बोललो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही सांगता ना बंद ठेवा म्हणून.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही ३६५ दिवस थोडे बोलतो. आम्ही खायला थोडी मना करतो.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे ह्यांच्या पत्रामध्ये म्हणतात की महाराष्ट्र शासन तर्फे राज्यात पर्युषण सणात तीन दिवस कत्तल खाने, मटन, चिकन शॉप बंद ठेवण्याचे आदेश आहेत. मग ठराव कसला करतात. महाराष्ट्र शासनाच्या आदेश ह्याच्यात मेन्शन केलं आहे. हा निर्णय कायम आहे. शासनाने हा आदेश तीन दिवसासाठी दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महाराष्ट्र शासनाला हे अधिकार आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

माजी महापौर सन्मा. नरेंद्र मेहता ब-याच वेळा म्हणतात की, महापौरांना काय समजत नाही. काय बोलतात मला कळत नाही त्यांच पत्र जर त्यांनी वाचून बघितल तर त्यांच्या पत्रामध्ये अकरा चुका आहेत. आपण दुस-याला म्हणतो ना तेव्हा कमीत कमी व्यवस्थित वाचायला पाहिजे. तुम्ही माजी महापौर आहात. **(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही ठराव मांडला तुम्ही निर्णय घ्या.

**भगवती शर्मा :-**

इन्होंने इसके आधार पे ठराव नही मांडा। ठराव मेरे ठराव के आधार पे मांडा है। तरी प्रशासनाने ह्या बाबतीत आवश्यक त्या उपाय योजना करुन पर्युषण मध्ये काळात दिनांक २५/०८/२०११ ते दिनांक ०१/०९/२०११ मध्ये ह्या काळामध्ये मांस, मटन, मच्छि विक्री व कत्तलखाने बंद ठेवण्याबाबतची कारवाई करणे. आठ दिन की जो सुचना है वो मेरा है। मैने प्रशासन से उस समय मागणी की थी। इन्होंने तीन दिन का किया था। लेकीन मैने उस समय चर्चा मे भी कहाँ था की यहाँ के जैन लोगों की भावना है की आठ दिन के लिए कत्तल खाने बंद रहने चाहीए। शासन के तरफ से जो निर्णय होता है वो लिजिए। मैने उस समय बोला था अगर मेरे ठराव करते है तो आपत्ती नही है।

**नरेंद्र मेहता :-**

विषय असा आहे की, पहिला "ज" खाली विषय दिला आणि नंतर भगवती शर्मा ह्यांनी लक्षवेधी मांडली मी तारीख बघितली विषय पहिला आम्ही दिलेला आहे. त्या संदर्भात शासनाने तीन दिवस असले तरी ह्या शहरात कमीत कमी आठ दिवस ठेवा असा आम्ही ठराव मांडला. त्यावर आपल्याला अधिकार आहे सभागृहाची भुमिका मांडायची मांडुन निर्णय द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण मला एक उत्तर द्या ह्या शहरामध्ये कोळी समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यांची मच्छी विक्री झाली तर महानगरपालिका त्यांना खर्च देणार का? तुम्ही खाऊ नका. तुम्हाला कोण म्हणतो आम्ही व्यवसाय करतो. कोण त्यांना पैसे देणार.

**नरेंद्र मेहता :-**

दादा ह्याच्यात मच्छिचा विषय नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आहे ना त्याचाच अर्थ आहे.

**नरेंद्र मेहता :-**

चिकन, मटन शॉप मच्छी नाही.

**मा. महापौर :-**

नगरपालिका ९१ ला झाली त्यावेळेलाच चार दिवसाचं बंद डिक्लेर झाला आहे. नविन रुल काय काढता.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव मांडलेला आहे. आपण निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :-**

आम्ही आजपर्यंत शासनाचे नियम पाळतो.

**अनिल सावंत :-**

शहरामध्ये कत्तल खाने कुठे आहेत?

**वंदना चक्रे :-**

ज्यांना मच्छी मटन नको त्यांनी गाव सोडून निघुन जावं. कशाला राहता या गावामध्ये मी तरी असं म्हणेन या गावात जैन लोकांनी राहू नये.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही विरोध करतो असं बोलण्याचा कोणाला अधिकार नाही. जैन समाजाने गावात राहू नये म्हणजे काय?

**वंदना चक्रे :-**

चिकन मटन खाऊ नका आम्ही खाणारी माणंस आम्ही काय करणार? मी बरोबर बोलली.

**मा. महापौर :-**

आम्ही काँग्रेसवाले आम्ही सगळ्या धर्मांना समान वागणूक देतो आम्ही सर्व लोकांना घेऊन चालतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, मी मांसाहारी आहे. मात्र शासनाचा जो निर्णय आहे तो मला मान्य आहे. पर्युषणाच्या काळात तीन दिवस बंद ठेवणे हे आम्हाला मान्य आहे. शासनाचा जो निर्णय आहे त्याला वगळून आम्ही कुठलाही ठराव करु नये ही माझी तुम्हाला विनंती राहील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, परिवहनच्या अधिका-यांना उत्तर द्यायचं नसेल तर नको..........

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर साहेब, तुम्हाला एक विनंती करतो की, सभागृहातील जे मा. सदस्यांचा बसचा जो महत्वाचा विषय आहे. तो विषयपटलावर विषय घ्यावा आणि मिरा भाईंदरच्या लोकांना जो त्रास आहे तो लवकर दुर करावा अशी तुम्हाला विनंती करतो.

**सिसिलीया बावीघर :-**

मा. महापौर साहेब, बसच्या संदर्भात मला सांगा.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, एक ठराव मांडतो. दि. २०/०८/२०११ च्या मा. महासभेमध्ये लक्षवेधीमार्फत मांडलेल्या सुचनेप्रमाणे पर्युषण पर्व काळामध्ये दि. २५/०८/२०११ ते दि. ०१/०९/२०११ या काळावधीमध्ये मांस, मटण, मच्छी विक्रीची दुकाने व कत्तलखाने बंद ठेवणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार पुढील वर्षात देखील त्याचप्रकारे काळ, वेळ पाहून कत्तलखाने व मांस, मच्छी विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा मी ठराव मांडीत आहे.

**प्रभात पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. आपण असे करु शकत नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

महापौर साहेब, मासळीचा सुद्धा उल्लेख केलेला आहे. तो त्याच्यातून रद्द करा. आम्ही मासळी कूठे न्यायची.

**नगरसचिव :-**

प्रकरण ५३ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. नरेंद्र मेहता अनुमोदक सन्मा. रामनारायण दुबे. दुसरा ठराव सुचक सन्मा. भगवती शर्मा अनुमोदक सन्मा. प्रभात पाटील. प्रथम मी दुसरा ठरावाचे वाचन करुन ठराव मतदानास टाकतो. दि. २०/०८/२०११ च्या मा. महासभेमध्ये लक्षवेधीमार्फत मांडलेल्या सुचनेप्रमाणे पर्युषण पर्व काळामध्ये दि. २५/०८/२०११ ते दि. ०१/०९/२०११ या काळावधीमध्ये मांस, मटण, मच्छी विक्रीची दुकाने व कत्तलखाने बंद ठेवणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार पुढील वर्षात देखील त्याचप्रकारे काळ, वेळ पाहून कत्तलखाने व मांस, मच्छी विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा मी ठराव मांडीत आहे.या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असेतील त्यांनी हात वर करायचे आहेत. पहिला ठराव वाचतो. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व धर्मांचे नागरीक राहत आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणे जैन समाज आहेत. जैन समाज दरवर्षी मोठ्या उत्साहाने पयुर्षण सण साजरा करतात. पयुर्षण हा ८ दिवसांचा सण असतो.

महाराष्ट्र शासनातर्फे राज्यात पयुर्षण सणात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन शॉप) बंद ठेवावे असे आदेश आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील जैन समाजाची भावना आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात पयुर्षणचे ८ दिवस कत्तलखाने बंद ठेवावे. जेणे कारणे या शहरात पशु / जीव हत्या होणार नाही व जैन धर्माचे पालन देखील होईल.

वरील विषयासाठी भविष्यात जेव्हा जैन धर्माच्या पयुर्षणाचा सण असेल तेव्हा त्या सणाच्या ८ दिवस दरवर्षी मिरा भाईंदर शहरातील कत्तलखाने बंद ठेवावेत असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असेतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. प्रभात पाटील ह्यांचा ठराव ४५ मतांनी पास झालेला आहे. १४ मतांनी विरोध आहे. त्याचप्रमाणे नरेंद्र मेहता ह्यांचा जो ठराव आहे त्याला १४ मत पडलेली आहेत आणि ४५ मतांनी विरोध आहे. सन्मा. प्रभात पाटील ह्यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

पयुर्षण सनात ३ दिवस कत्तलखाने (चिकन मटन) शॉप बंद ठेवणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

दि. २०/०८/२०११ च्या मा. महासभेमध्ये लक्षवेधीमार्फत मांडलेल्या सुचनेप्रमाणे पर्युषण पर्व काळामध्ये दि. २५/०८/२०११ ते दि. ०१/०९/२०११ या काळावधीमध्ये मांस, मटण, मच्छी विक्रीची दुकाने व कत्तलखाने बंद ठेवणेबाबत निर्णय झाला होता. त्यानुसार पुढील वर्षात देखील त्याचप्रकारे काळ, वेळ पाहून कत्तलखाने व मांस, मच्छी विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- सौ. प्रभात पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | निरंक |
| २ | पाटील उमाताई शाम | २ | वर्षा गिरधर भानुशाली | |
| ३ | नलावडे दिनेश दगडू | ३ | सिंह मदन उदितनारायण | |
| ४ | वेतोस्कर राजेश शंकर | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ५ | सुनिता कैलास पाटील | ५ | पाटील शरद केशव | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | बाविघर सिसिलीया विजय | |
| ७ | सावळे निर्मला बाबुराव | ७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ८ | कुरेशी याकुब ईस्माईल | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शशिकांत जगन्नाथ भोईर | ९ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १० | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | १० | यादव मिरादेवी रामलाल | |
| ११ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | ११ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १२ | जंगम लक्ष्मण गणपत | १२ | पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १३ | सपार उमा विश्वनाथ | १३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १४ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १५ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | | |
| १६ | मुंज वासुदेव भास्कर | | | |
| १७ | शफीक अहमद सादत खान | | | |
| १८ | प्रमोद जयराम सामंत | | | |
| १९ | मर्लिन मर्विन डिसा | | | |
| २० | विजया हेमचंद्र वैती | | | |
| २१ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २२ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २३ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २६ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २७ | शेख सलिम दाऊद | | | |
| २८ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| ३० | नयना गजानन म्हात्रे | | | |
| ३१ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३२ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३३ | राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | | | |
| ३४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | | |
| ३५ | पाटील मिलन गोविंदराव | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३७ | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | | | |
| ३८ | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | | | |
| ३९ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४० | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४१ | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४२ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४३ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४४ | टेरी पॉल परेरा | | | |
| ४५ | राजु यशवंत भोईर | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४ सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवाला ह्यांचा प्रस्ताव आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. ओमप्रकाश गारोडीया हजर नाहीत.

**चंद्रकांत मोदी :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल आए नही कैसे लेंगे साहब।

**मा. महापौर :-**

विषय वाचू नका . सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**